
cmyk




दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-७१ | रविवार दि.३१ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### दहशतवादी कट उधळला, ९ एजंट ताब्यात

दिल्ली: दिल्ली पोलिसांच्या विशेष सेलने एक मोठा दहशतवादी हल्ल्याचा कट उधळून लावला आहे. एनडीआरने पाकिस्तानी आएसआय आणि मुंबई अंडरवर्लड नेटवर्कच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या ९ आरोपींना अटक केली आहे. हे सर्व आरोपी दिल्लीतील महत्वाची ठिकाणे, सुरक्षा दलांवर हल्ला करण्याच्या तयारीत होते. पोलिसांनी यांच्याकडून अनेक शस्त्रे आणि दारूगोळा जप्त केला आहे. दिल्ली पोलिसांच्या विशेष सेलने याबाबत माहिती दिली आहे. त्यानुसार आयएसआय आणि अंडरवर्ल्डशी संबंधित ९ जणांना दिल्लीच्या वेगवेगळ्या ठिकाणी हल्ला करण्याचं काम दिलं होतं. अधिकाऱ्यांनी सांगितलं की मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आम्ही हे ऑपरेशन लाँच केलं होतं. या ऑपरेशन अंतर्गत या ९ लोकांना अटक करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून या मॉड्युलवर पोलिसांची नजर होती.

### पेट्रोलमध्ये जास्तीत जास्त इथेनॉल मिश्रणासाठी प्रयत्न

पुणे: देशाचे अर्थकारण कृषी क्षेत्राशी संबधित आहे, पण या क्षेत्राचा स्वातंत्र्यापासून अपेक्षित विकास अद्याप झालेला नाही, असे मत केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा) यांच्यावतीने आयोजित साखर आणि जैव ऊर्जा (बायोएनर्जी) या विषयावरील परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले, देशाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायचे असेल, देशाला महासत्ता बनवायचे असेलत तर कृषी विकासाचा दर वाढवायला लागेल. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा साखर उद्योगाशी संबधित आहे. तेल आयातीसाठी भारताचे २३ लाख कोटी रुपये दरवर्षी खर्च होतात. हेच पैसे आपल्या देशातील ग्रामीण शेतकऱ्याच्या खिशात गेले तर गावातील गरिबी आणि बेरोजगारी दूर झाल्याशिवाय राहणार नाही, असे मत मंत्री गडकरी यांनी व्यक्त केले.

### ममतादीदींच्या पुतण्यावर जीवघेणा हल्ला

कोलकाता: तृणमूल काँग्रेस नेते अभिषेक बॅनर्जी यांच्यावर पश्चिम बंगालमधील सोनारपूर येथे जीवघेणा हल्ला झाला. हल्ला होत असल्याचे लक्षात आल्यानंतर लगोलग सुरक्षा दलांनी त्यांना हेल्मेट घालायला देऊन घटनास्थळावरून सुरक्षित ठिकाणी घेऊन गेले. पश्चिम बंगालमध्ये सत्ता बदल होताच भारतीय जनता पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील संघर्ष मुद्द्यांवरून गुद्द्यावर पोहोचला आहे. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास अभिषेक बॅनर्जी यांच्यावर दगडफेक झाली. अज्ञातांनी त्यांच्या दिशेने अंडीही फेकून मारली. त्यानंतर त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. अभिषेक बॅनर्जी यांनी आपल्यावरील हल्ल्याला भाजपला जबाबदार धरले आहे.

### कापूस आयात शुल्क हटविण्याचा निर्णय

# काापड उद्योगाला दिलासा, पण शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्र सरकारने कापूस आयातीवरील ११ टक्के शुल्क १ जुलै ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीसाठी तात्पुरते हटविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने शनिवारी (दि.३०) याबाबत अधिसूचना जारी केली. सरकारच्या मते या निर्णयामुळे देशातील कापड उद्योगाला पुरेसा कच्चा माल उपलब्ध होईल, उत्पादन खर्चावर नियंत्रण राहील आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय वस्त्रोद्योगाची स्पर्धात्मकता टिकून राहण्यास मदत होईल. मात्र, नव्या कापूस हंगामाच्या तोंडावर घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकरी आणि कृषी क्षेत्रातील अभ्यासकांनी चिंता व्यक्त केली आहे.**




सरकारने अधिसूचनेत म्हटले आहे की, देशातील वस्त्रोद्योग आणि वस्त्रनिर्मिती क्षेत्राला सातत्याने कापसाचा पुरवठा होणे आवश्यक आहे. त्यामुळे आयातीवरील सर्व प्रकारचे शुल्क पाच महिन्यांसाठी हटविण्यात आले आहे. यामुळे कापड उद्योगाला दिलासा मिळेल, तसेच ग्राहकांनाही कपडे आणि वस्त्रांच्या किमतींमध्ये स्थैर्याचा फायदा मिळू शकतो. गेल्या काही महिन्यांत देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाच्या दरात लक्षणीय वाढ झाली होती. त्याचवेळी कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे पॉलिस्टरसारख्या कृत्रिम तंतूंच्या किमतीही वाढल्या. परिणामी वस्त्रोद्योगाचा कल पुन्हा नैसर्गिक तंतू असलेल्या कापसाकडे वळला. कापड उत्पादकांनी कच्च्या मालाच्या वाढत्या खर्चाबाबत चिंता व्यक्त करत केंद्र सरकारकडे आयात शुल्क हटविण्याची मागणी केली होती. उद्योग क्षेत्राचे म्हणणे आहे की, जागतिक बाजारात भारताला बांगलादेश, व्हिएतनाम, चीन आणि इतर वस्त्रउत्पादक देशांशी स्पर्धा करावी लागते. देशांतर्गत कापूस महाग झाल्यास निर्यातीवरील परिणाम होऊ शकतो. त्यामुळे स्वस्त दरातील आयातीत कापूस उपलब्ध झाल्यास भारतीय वस्त्रोद्योगाची स्पर्धात्मकता टिकून राहील आणि ◀◀ पान २ वर

### सरकारचा शेतकरीहिताचा दावा

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या हिताला धक्का बसणार नसल्याचा दावा केला आहे. सरकारच्या मते, आयात होणारा कापूस हा बहुतांश विशेष दर्जाचा असून तो देशात मोठ्या प्रमाणावर उत्पादित होत नाही. त्यामुळे त्याची थेट स्पर्धा भारतीय कापसाशी होणार नाही. याशिवाय आयातीत कापूस देशातील नव्या उत्पादनाच्या आवकेपूर्वी येणार असल्याने बाजारावर त्याचा मोठा परिणाम होणार नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. कापसाच्या दरांवर केंद्र सरकार सातत्याने लक्ष ठेवून असून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### अंतरवाली सराटीत विखे-पाटील यांची भेट पण उपोषणावर ठाम

# समाजाच्या सुखासाठी जरांगे पाटील उन्हात

जालना । वृत्तसंस्था

राज्याचे कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शनिवारी अंतरवाली सराटी येथे जाऊन उपोषणाला बसलेले मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत शासन आणि आंदोलन प्रतिनिधींमध्ये झालेल्या चर्चेतील मुद्द्यांवर सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती विखे-पाटील यांनी जरांगे यांना दिली. दरम्यान, जरांगे पाटील हे आपल्या भुमिकेवर ठाम असून, उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला आहे.



भेटीनंतर बोलताना मनोज जरांगे यांनी शासनाने मांडलेल्या निर्णयांचा आणि लिखित मसुद्याचा अभ्यास तज्ज्ञ व अभ्यासकांशी चर्चा करून केला जाईल, त्यानंतर पुढील भूमिका जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट केले. जरांगे यांनी त्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत कोणतीही माघार घेतलेली नसल्याचे स्पष्ट केले. सातारा गॅझेटची अंमलबजावणी तसेच मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना या ◀◀ पान २ वर

### पंकजा मुंडे यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सुचना;उपोषणस्थळी जावून भेट घ्या



मराठा समाज बांधवांच्या आरक्षणाच्या मागणीसाठी कडक उन्हात आमरण उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची उपोषण स्थळी जावून भेट घ्यावी, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. पंकजा मुंडे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना लेखी पत्र पाठवून निर्देश दिले आहेत. पंकजाताई म्हणाल्या की, अशा कडक उन्हात त्यांचे आमरण उपोषण त्यांच्या प्रकृतीसाठी योग्य नाही. जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी आवश्यक असल्यास मी येण्यास देखील तयार आहे. आपण तात्काळ जावून त्यांची भेट घ्यावी, त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे निवेदन स्वीकारावे असे ना. पंकजाताईंनी जिल्हाधिकारी यांना म्हटले आहे.




## मनिषा हवालदारला सीबीआय कोठडी, तर मनिषा मांढरेला न्यायालयीन

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशभरात खळबळ माजवणाऱ्या नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणाचा तपास आता अधिक तीव्र झाला आहे. या प्रकरणातील महत्त्वाच्या आरोपी मनीषा हवालदार आणि मनीषा मांढरे यांना केंद्रीय अन्वेषण विभागाने विशेष सीबीआय कोर्टासमोर हजर केले होते. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने मनीषा हवालदार यांना दोन दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे, तर दुसरी आरोपी मनीषा मांढरे यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान सीबीआयच्या वकिलांनी कोर्टात मनीषा हवालदार यांच्या कोठडीची मुदत वाढवून देण्याची जोरदार मागणी केली. या संपूर्ण घोटाळ्याचा सखोल तपास ◀◀ पान २ वर

## माजलगावच्या मनुर शिवारात पोत्यात भरलेले अवशेष गोवंशाचे?

### कार्यकर्त्यांकडून चौकशीची मागणी



माजलगाव । वृत्तसंस्था

**माजलगाव शहरालगतच्या मनुर शिवार परिसरात पोत्यांमध्ये भरलेले कथित गोवंशाचे अवशेष आढळल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.**

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, मनुर शिवार परिसरात मोठ्या प्रमाणात पोती टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. या पोत्यांमध्ये गोवंशाचे अवशेष असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. ◀◀ पान २ वर

# मॉन्सून केरळच्या उंबरठ्यावर

### विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात पावसाचा इशारा

दिल्ली । प्रतिनिधी

नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनच्या पुढील वाटचालीसाठी पोषक स्थिती निर्माण झाली असून मॉन्सून शनिवारी (ता.३०) केरळच्या उंबरठ्यावर पोहचला आहे. शनिवारी मॉन्सून लक्षद्वीप परिसर, कोमोरिन क्षेत्र म्हणजेच कन्याकुमारीजवळील समुद्र भाग, अरबी समुद्राचा नैऋत्य व आग्नेय भाग आणि बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य, मध्य तसेच ईशान्य भागापर्यंत पुढे सरकला आहे.

तर पुढील चार ते पाच दिवसात मॉन्सून



अरबी समुद्राच्या आणखी काही भागांमध्ये, लक्षद्वीप बेटांमध्ये, केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागांत तसेच बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य, मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य भागातील आणखी काही क्षेत्रांपर्यंत मजल मारण्याची शक्यता हवामानशास्त्र ◀◀ पान २ वर

## ऑपरेशन सिंदूर २.० ची तयारी, यावेळी वायू, नौदलही सज्ज-लष्कर प्रमुख

दिल्ली । वृत्तसंस्था

भारतीय लष्कर प्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी शनिवारी (दि.३० मे) भारत ऑपरेशन सिंदूर २.० ची तयारी करत आहे, असे खळबळजनक विधान केले आहे. पहलगाम दहशवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानविरूद्ध केलेली कारवाई अजूनही सुरू आहे याचा देखील द्विवेदी यांनी पुनरूच्चार केला.



एएनआयशी बोलताना लष्कर प्रमुखांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. सध्या फक्त आक्रमक कारवाईच्या ऐवजी तातपूरती शस्त्रसंधी लागू आहे. जनरल द्विवेदी यांनी पाकिस्तानचे नाव न घेता इशारा देत भारताची लष्करी तयारी किती आहे हे अधोरेखित केले. त्यांनी फक्त लष्करच ◀◀ पान २ वर

# विद्यार्थ्यांच्या गणवेशात घोळ घालणाऱ्या शाळांवर आता थेट कारवाई

### पहिल्याच दिवशी गणवेश वाटप बंधनकारक, निकृष्ट कापड आढळल्यास चौकशी

मुंबई । वृत्तसंस्था

शाळा सुरू झाल्यानंतरही विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपात होणाऱ्या दिरंगाईची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, गणवेशाचे कापड निकृष्ट दर्जाचे आढळल्यास पुरवठादार, संबंधित शाळा व्यवस्थापन समितीवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा शालेय शिक्षण विभागाने दिला ◀◀ पान २ वर



# मागणी एकच, पण मार्ग वेगळे!

### आंतरवालीत मनोज जरांगे तर शेतात अमोल खुणे यांचे रखरखत्या उन्हात उपोषण




बीड । प्रतिनिधी

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने शब्द पाळला नाही म्हणून अंतरवली सराटी येथे मनोज सारंगे पाटील यांनी रखरखत्या उन्हात बाजेवर बसून उपोषण सुरू केले आहे तर दुसरीकडे त्यांचे पूर्वाश्रमीचे सहकारी आणि आत्ताचे विरोधक अमोल खुणे यांनी यांनीही आपल्या शेताताच रणरणत्या उन्हामध्येच अर्ध नग्न आंदोलन सुरू केले आहे.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा एकदा तापू लागले आहे. मराठा






समाजाला आरक्षण मिळावे, सातारा गॅझेट लागू करावे, आणि मराठवाड्यातील संपूर्ण मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा, या प्रमुख मागण्यांसाठी ◀◀ पान २ वर

## डी.के.शिवकुमार ३ जून रोजी घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ

बंगळूरु । वृत्तसंस्था

कर्नाटकच्या राजकारणातील मोठ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर डी.के. शिवकुमार मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शनिवारी बंगळूरु विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक झाली. यावेळी डी. के. शिवकुमार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. दरम्यान, शिवकुमार हे ३ जून रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. बैठकीत मुख्यमंत्री सिद्धरामैया यांनी पहिला प्रस्ताव मांडला, ज्यामध्ये नवीन विधिमंडळ पक्षनेत्याचा निर्णय काँग्रेस हायकामांड करेल असे सांगण्यात आले होते. या प्रस्तावाला डॉ. जी. परमेश्वर यांनी अनुमोदन दिले. बैठकीत हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. बैठकीदरम्यान काँग्रेस विधिमंडळ पक्षाने सिद्धरामैया यांच्या सेवांचे कौतुक केले. पक्ष आणि कर्नाटकच्या जनतेसाठी त्यांनी दिलेल्या विशेष योगदानाचा गौरव करत त्यांचे आभार मानण्यात आले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.३० मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४९.५० क्विंटल | १,८४७ | २,४७० | २,३०१ |
| ज्वारी/हायब्रिड: ११९.०० क्विंटल | १,८८८ | ४,१७७ | २,८४२ |
| मका/लोकल: ८.५० क्विंटल | १,७०० | १,९७० | १,८३५ |
| तूर : १०.५० क्विंटल | -- | -- | -- |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरी: १४२.५० क्विंटल | २,००० | २,५१३ | २,३११ |
| मुग: -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१०.५० क्विंटल | ६,२०० | ७,०५० | ६,६२५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,६८० | ५,७९० | ५,७३५ |

cmyk

## अग्रलेख

# विषारी दारू : केवळ दुर्घटना की व्यवस्थेचा गुन्हा?

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात रसायनयुक्त बनावट मद्य प्राशनामुळे १८ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, काही जण अद्यापही मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेमुळे विषारी दारूचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे अशा घटना देशात नवीन नाहीत. दर काही महिन्यांनी देशाच्या कुठल्या ना कुठल्या भागातून विषारी दारूमुळे मृत्यू झाल्याच्या बातम्या समोर येतात. काही दिवस गदारोळ होतो, चौकशीच्या घोषणा होतात, कारवाया केल्या जातात आणि नंतर सर्व काही पूर्ववत सुरू होते. परिणामी, या मृत्यूंची मालिका थांबत नाही. भारतात विषारी किंवा बनावट दारूमुळे दरवर्षी सरासरी ८०० ते १००० नागरिकांचा मृत्यू होतो. नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरोच्या आकडेवारीनुसार २०१६ ते २०२१ या काळात देशात तब्बल ६,९५४ जणांनी विषारी दारूमुळे आपला जीव गमावला. ही संख्या एखाद्या मोठ्या नैसर्गिक आपत्तीतील बळींच्या संख्येशी स्पर्धा करणारी आहे. तरीही या समस्येकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, ही अधिक चिंतेची बाब आहे.

विषारी दारूमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब, बिहार आणि कर्नाटक ही राज्ये आघाडीवर असली, तरी महाराष्ट्रही या यादीतून पूर्णपणे बाहेर नाही. २०१५ मध्ये मुंबईच्या मालवणी परिसरात विषारी दारूच्या सेवनाने १०६ जणांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. अनेकांनी दृष्टी गमावली, काही कायमचे अपंग झाले. आता पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये घडलेल्या दुर्घटनेने त्या भयावह आठवणी पुन्हा जाग्या केल्या आहेत. या प्रकरणातील तपासातून समोर आलेली माहिती अधिक धक्कादायक आहे. दारूची नशा आणि तीव्रता वाढविण्यासाठी मुख्य आरोपीने तब्बल २१५ लिटर मिथेनॉल मिसळल्याचा आरोप आहे. मिथेनॉल हे अत्यंत विषारी रसायन असून त्याचा वापर औद्योगिक क्षेत्रात, रंगनिर्मितीत आणि विद्रावक म्हणून केला जातो. मानवी शरीरात गेल्यास ते अंधत्व, मूत्रपिंड निकामी होणे आणि मृत्यू यास कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, उद्योगांसाठी राखीव असलेले हे घातक रसायन गुन्हेगारांच्या हातात पोहोचतेच कसे? वास्तविक पाहता ही केवळ एका आरोपीची किंवा एका टोळीची बाब नाही. यामागे अवैध दारू निर्मिती, पुरवठा, वाहतूक, विक्री आणि संरक्षण यांचे मोठे जाळे कार्यरत असते. अशा धंद्यांना स्थानिक पातळीवर राजकीय, प्रशासकीय किंवा पोलिस संरक्षण मिळत असल्याच्या चर्चा अनेकदा ऐकू येतात. अवैध दारूचे अड्डे वर्षानुवर्षे सुरू राहतात, यावरूनच व्यवस्थेतील त्रुटी स्पष्ट होतात. अधूनमधून छापे टाकून काही लिटर दारू जप्त करणे किंवा किरकोळ आरोपींना पकडणे यामुळे मूळ समस्या सुटत नाही. उलट मोठे मासे कायमच सुटत राहतात. या प्रकरणातील मुख्य आरोपी हा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नोंदीवरील सराईत गुन्हेगार असल्याचे सांगितले जात आहे. जर हे सत्य असेल, तर प्रशासन आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. गुन्हेगारांची माहिती असूनही त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयश का आले? त्यांची हालचाल, आर्थिक व्यवहार आणि अवैध व्यवसाय वाढू कसा दिला गेला? या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत.

दारूबाबत सरकारची भूमिका देखील अनेकदा दुटप्पी वाटते. एका बाजूला दारूमुळे होणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक दुष्परिणामांवर भाष्य केले जाते; तर दुसऱ्या बाजूला महसुलासाठी दारू विक्रीला प्रोत्साहन दिले जाते. राज्यांच्या महसुलात मद्यविक्रीचा मोठा वाटा असल्याने सरकारे कठोर निर्णय घेण्यास टाळाटाळ करतात. परिणामी दारूविरोधी जनजागृती, व्यसनमुक्ती आणि नियंत्रण या विषयांना अपेक्षित प्राधान्य मिळत नाही. गुजरात आणि बिहारसारख्या काही राज्यांनी दारूबंदी लागू केली आहे. तथापि, दारूबंदी हा अंतिम उपाय आहे का, याबाबत मतभेद आहेत. कारण दारूबंदी असलेल्या राज्यांतही अवैध दारूचा व्यापार पूर्णपणे थांबलेला नाही. उलट काही वेळा त्यातूनच विषारी दारूचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे केवळ दारूबंदी नव्हे, तर कठोर अंमलबजावणी, रसायनांच्या पुरवठ्यावर नियंत्रण, प्रभावी गुप्तचर यंत्रणा आणि जनजागृती यांचा एकत्रित विचार करावा लागेल.ङ्ग्या संपूर्ण प्रकरणातील सर्वात वेदनादायक बाब म्हणजे याचे बळी ठरणारा वर्ग. विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडणारे बहुतेक लोक हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात. रोजंदारीवर जगणारे मजूर, कामगार, स्थलांतरित आणि तळागाळातील नागरिक स्वस्त दारूच्या शोधात हातभट्टी किंवा बेकायदेशीर मद्याचा आधार घेतात. त्यांना ब्रँडेड दारू परवडत नाही. गरिबी, व्यसन आणि उपलब्धता या त्रिसूत्रीच्या कचाट्यात ते अडकतात. शेवटी त्याची किंमत त्यांना स्वतःच्या जीवाने मोजावी लागते. सरकारने यापुढे केवळ चौकशी समित्या नेमून किंवा निलंबनाची कारवाई करून थांबता कामा नये. मिथेनॉलसारख्या रसायनांच्या विक्रीवर डिजिटल ट्रॅकिंग व्यवस्था निर्माण करणे, अवैध दारू निर्मिती केंद्रांवर सातत्यपूर्ण आणि तंत्रज्ञानाधारित कारवाई करणे, दोषी अधिकाऱ्यांवर कठोर शिक्षा करणे, तसेच व्यसनमुक्ती आणि जनजागृती मोहिमा व्यापक स्वरूपात राबविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर समाजानेही या प्रश्नाकडे केवळ गुन्हेगारी म्हणून नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील १७ मृत्यू ही केवळ आकडेवारी नाही. ती व्यवस्थेच्या अपयशाची आणि मानवी जीविताच्या अवमूल्यनाची शोकांतिका आहे. प्रत्येक घटनेनंतर अश्रू ढाळणे, नुकसानभरपाई जाहीर करणे आणि काही दिवस चर्चा करणे पुरेसे नाही. या विषारी साखळीला कायमचे खंडित करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, प्रशासनिक प्रामाणिकपणा आणि सामाजिक जागरूकता यांची नितांत गरज आहे. अन्यथा पुढील दुर्घटनेची केवळ तारीख बदलत राहील आणि मृत्यूंची संख्या वाढत राहील.

# ऊन-पावसाच्या उंबरठ्यावर शेतकऱ्याची कसोटी पणाला..

## उष्णतेच्या दाहकतेने उभ्या पिकाची होतेय होरपळ

**शिरूर । प्रतिनिधी**

उन्हाळा हंगाम संपत आला असून अवघ्या पाच-सात दिवसात राज्यामध्ये मान्सून दाखल होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे काही दिवसातच पाऊसकाळ सुरु होईल अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी उराशी बांधलेली असली तरी उन्हाळ्याच्या शेवटच्या चरणामध्ये सूर्यनारायण आग ओकू लागल्यामुळे उन्हाचा पारा ४१ अंशाच्या वर चढला आहे. वाढत्या उष्णतेच्या दाहकतेने शेतातील ऊस,फळबाग, तरकारी,भाजीपाला या पिकांची ऊन -पावसाच्या उंबरठ्यावर होरपळ होऊ लागल्याने ही पिके जगवण्यासाठी शेतकऱ्यांना आपली कसोटी पणाला लावावी लागत आहे.

मे महिन्याचा शेवटचा आठवडा संपत आला तरी उन्हाची तीव्रता काही केल्याने कमी होण्याची नाव घेत नाही. उलट गेल्या पंधरा-वीस दिवसापासून उन्हाची दाहकता अधिकाधिक वाढत चालल्याने शहरी भागासह ग्रामीण भागातील जनतेचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. उन्हाळा अगदी शेवटच्या टप्प्यात आल्याने शेतकऱ्यांना लवकरात लवकर पाऊस पडावा आणि शेती उद्योग मार्गी लागावा अशी अपेक्षा आहे. मात्र यावर्षी मे महिना संपत आला तरी अद्याप मान्सूनपूर्व पाऊस न बरसल्याने शेतीची पूर्व मशागतीची कामे खोळंबली आहेत. तर पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोलवर गेल्याने विहिरी -बोर कोरडे पडू लागले आहेत. एकीकडे पाण्याच्या पातळीने तळ गाठला आहे तर दुसरीकडे उन्हाची तीव्रता वाढली आहे. यामुळे केल्या अनेक दिवसापासून शेतामध्ये जोपासलेली, मोसंबी, आंबा, पेरू, डाळिंब आदींची फळबाग, शेतातील भाजीपाला तरकारी, यासह उभा असलेला ऊस पाऊस पडेपर्यंत जगवणे शेतकऱ्यांना मोठे जिकरीचे झाले आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे या पिकांची होरपळ होताना दिसू लागली आहे. विद्युत वितरणाचे अडथळे त्यातच शेतकऱ्यांच्या पाचीला पुंजलेले आहेत यामुळे उभे पिक जगवण्यासाठी शेतकऱ्यांना उन्हाळ्याचे शेवटी आणि पावसाळ्याच्या उंबरठ्यावर आपली कसोटी पणाला लावण्याची वेळ आली आहे.

### मान्सूनच्या हुलकावणीने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर

२६ मे रोजी यावर्षी मान्सून केरळमध्ये दाखल होणार असे हवामानाची वृत्त आल्याने शेतकऱ्याला यावर्षी मानसून पूर्व पाऊस, त्याचबरोबर महाराष्ट्रात लवकरच पाऊस सुरू होईल अशी अपेक्षा होती मात्र गेल्या चार-पाच दिवसांपासून मानसूनने हुलकावणी दिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे. उन्हाची तीव्रता आणि मान्सूनची हुलकावणी यामुळे शेतकरी राजा पुरता चिंतातुर झालेला आहे.

### खरिपाच्या पूर्व मशागतीला खिळ


लग्नसराई संपतात शेतकरी राजा खरीप हंगामाच्या पूर्वमशागतीच्या कामासाठी शेतामध्ये राब-राब राबत असतो. शेताची नांगरट झाली की मान्सून पूर्व पडलेल्या पावसाने पूर्व मशागतीची कामे शेतकऱ्यांना करणे सोयीस्कर होत असते. मात्र यावर्षी अद्याप तरी मान्सूनपूर्व पाऊस न बरसल्याने पूर्व मशागतीची कामे करणे अवघड झाले आहे. त्यातच इंधन दरवाढीची ही भर पडल्याने अतिरिक्त खर्चाची कात्री शेतकऱ्याच्या खिशाला हे तर वेगळेच.

# कपिलधार येथे परम् रहस्य ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन

## संत मनमथ स्वामी यांच्या ४२६ व्या ग्रंथ स्मरणार्थ एक जून रोजी एकदिवसीय धार्मिक कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

**संत शिरोमणी श्री मन्मथ स्वामी यांनी लिहिलेल्या पवित्र 'परम् रहस्य' ग्रंथाच्या ४२६ व्या स्मरणार्थ श्रीक्षेत्र कपिलधार येथे रविवार, दि. १ जून रोजी एकदिवसीय भव्य पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**



हा धार्मिक कार्यक्रम सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक या सोहळ्यास उपस्थित राहणार असून विविध भागांतून अनेक शिवाचार्य यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला धार्मिक व अध्यात्मिक महत्त्व अधिक वाढले आहे. लिंगायत समाजामध्ये अत्यंत श्रद्धेचा विषय असलेला 'परम् रहस्य' हा ग्रंथ संत मन्मथ स्वामी यांनी रचला असून या ग्रंथामध्ये ईश्वरभक्ती, जीवनमूल्ये, अध्यात्म, तसेच महादेवाच्या महात्म्याचे सखोल व तत्त्वज्ञानात्मक विवेचन करण्यात आले आहे. त्यामुळे हा ग्रंथ समाजात अत्यंत पवित्र आणि मार्गदर्शक मानला जातो. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता ध्वजपूजन व महाआरतीने होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या संपूर्ण कालावधीत सामूहिक 'परम् रहस्य' ग्रंथ पारायण, प्रवचन, तसेच कीर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर भक्तिगीत, आध्यात्मिक मार्गदर्शन व संतवचनांमुळे परिसरात अखंड भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. सायंकाळी ५ वाजता कार्यक्रमाची सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. हा सोहळा समस्थ वीरशैव लिंगायत समाज, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, निवास, स्वच्छता, सुरक्षा तसेच आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या पारायण सोहळयास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरून...

### कापड उद्योगाला दिलासा, पण

निर्यात वाढीस चालना मिळेल. केंद्र सरकारने यापूर्वी ऑगस्ट ते डिसेंबर २०२५ या कालावधीतही कापूस आयातीवरील शुल्क हटविले होते. त्या काळात अमेरिकेने भारतीय कापड उत्पादनांवर शुल्क लागू केल्याने निर्यात क्षेत्रावर दबाव निर्माण झाला होता. त्यावेळी उद्योगांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर १ जानेवारी २०२६ पासून पुन्हा ११ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले होते. मात्र, सध्याच्या परिस्थितीत कापसाच्या वाढत्या दरांमुळे आणि उद्योगांच्या मागणीमुळे सरकारने पुन्हा एकदा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि बाजार अभ्यासकांनी या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या हितावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. यंदा भारतीय हवामान विभागाने काही भागांत कमी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे कापूस उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बियाणे, खते, कीडनाशके, मजुरी आणि सिंचन यांचा खर्च वाढल्याने कापूस उत्पादनाचा खर्चही वाढणार आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाची भरपाई होण्यासाठी चांगला बाजारभाव मिळणे आवश्यक आहे. मात्र, नव्या हंगामातील कापूस बाजारात येण्यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर आयातीत कापूस देशात दाखल झाल्यास बाजारात अतिरिक्त पुरवठा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये नवीन कापूस बाजारात येण्यास सुरुवात झाल्यानंतर भावांवर दबाव येण्याची शक्यता अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, देशांतर्गत उत्पादन आणि आयातीत कापूस यांचा एकत्रित पुरवठा वाढल्यास व्यापारी आणि उद्योगांकडून खरेदीचा वेग कमी होऊ शकतो. त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या दरांवर होण्याची भीती आहे.

---------------

### मनिषा हवालदारला सीबीआय कोठडी, तर

करणे अत्यंत गरजेचे आहे. या गुन्ह्यामध्ये मोठे आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय असून, त्याचे आर्थिक धागेदोरे शोधणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद सीबीआयने कोर्टात केला. सीबीआयचा हा दावा ग्राह्य धरत कोर्टाने हवालदार यांना दोन दिवसांची सीबीआय कोठडी मंजूर केली. तपासाला गती देण्यासाठी आणि भक्कम पुरावे गोळा करण्यासाठी सीबीआयने कोर्टाकडे एक महत्त्वाची परवानगी मागितली आहे. मनीषा हवालदार यांचे हस्ताक्षर आणि सहीचे नमुने घेण्याची परवानगी सीबीआयने न्यायालयाकडे मागितली असून, या फॉरेन्सिक पुराव्यांद्वारे पेपर फुटीतील संशयास्पद कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. दुसरीकडे, मनीषा मांढरे यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळाल्यामुळे त्यांची रवानगी आता तुरुंगात होणार आहे. या पेपर फुटीच्या मागे आणखी कोणते मोठे मासे आहेत आणि याचे जाळे कुठपर्यंत पसरले आहे, याचा शोध आता सीबीआय पुढील दोन दिवसांच्या कोठडीत मनीषा हवालदार यांच्या चौकशीतून घेणार आहे.

--------------

### समाजाच्या सुखासाठी

मागण्यांवर ते ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाकडून सादर करण्यात आलेल्या लिखित मसुद्यात काही मुद्द्यांवर निश्चित कारवाईचे आश्वासन देण्यात आले असल्याची माहितीही समोर आली आहे. भेटीदरम्यान राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मनोज जरांगे यांना आरोग्याचा विचार करून अभ्यासकांशी चर्चा पूर्ण होईपर्यंत सावलीत बसण्याची विनंती केली. उपोषणामुळे वाढत्या उष्णतेचा आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. मात्र, जरांगे यांनी ही विनंती स्वीकारण्यास नकार दिला. "जोपर्यंत मागण्यांबाबत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत आंदोलनाची भूमिका कायम राहील," अशी भूमिका घेत जरांगे यांनी उन्हातच उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आंदोलनस्थळी तणावपूर्ण पण शांत वातावरण असून, मराठा समाजाचे लक्ष आता शासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये संवाद सुरू असला तरी महत्त्वाच्या मागण्यांवर अद्याप अंतिम तोडगा निघालेला नाही. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या चर्चांकडे राज्यभरातील मराठा समाजाचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

----------

### ऑपरेशन सिंदूर २.० ची तयारी,

नाही तर भारताचे वायू दल आणि नौदल देखील गरज पडल्यास नव्या ऑपरेशनसाठी सज्ज आहे असे सांगितले. लष्कर प्रमुख द्विवेदी म्हणाले, भारतीय लष्कर आणि सर्व तीन सुरक्षा दल ऑपरेशन सिंदूर २.० साठी तयारी करत आहे. सध्याच्या घडीला आम्ही आमच्यातील समन्वय वाढवत आहोत. तसेच पुढच्या युद्धासाठी सज्जता वाढवत आहोत. द्विवेदी पुढे म्हणाले, आता युद्धभूमी इतकी पारदर्शक झाली आहे की, प्रत्येकाची प्रत्येक हालचाल ही दुसऱ्या देशाला कळते. त्यामुळं डिप्लॉयमेंट, एम्प्लॉयमेंट आणि सुरक्षेबाबत अत्यंत काळजी घ्यावी लागते. आमचे लष्कर आणि सीमा भागातील नागरिकांच्या संरक्षणासाठी ही काळजी घ्यावी लागते. यापुर्वी भारताने ऑपरेशन सिंदूर राबविले होते. हा पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरूद्ध लष्करी प्रत्युत्तर होते. हे ऑपरेशन ७ मे आणि ८ मे २०२५ च्या रात्री लाँच करण्यात आले होते. हे २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर होते. या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांना जीव गमवावा लागला होता.

----------

### मॉन्सून केरळच्या उंबरठ्यावर

विभागाने वर्तवली आहे. राज्यात विविध भागात उन्हाच्या चटक्यासह उकाडा कायम आहे. तर काही भागात ढगाळ वातावरणासह पूर्वमोसमी पावसाच्या सरी हजेरी लावत आहेत.विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटात गारपिटीसह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर कोकणात उष्णतेच्या चटक्यासह हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. विदर्भात चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी गारपीटीसह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असून जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यात हलक्या ते मध्यम सरी हजेरी लावण्याचा अंदाज आहे. तर उर्वरित भागात कोरड्या हवामानासह उन्हाचा चटका कायम राहण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मध्यम पावसाची शक्यता आहे. तर जळगाव आणि नाशिक जिल्ह्यात मेघगर्जनेसह मध्यम पावसाचा अंदाज असून पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावण्याची शक्यता आहे. तर उर्वरित भागात कोरडे हवामान राहील, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. कोकणात पालघर जिल्ह्यात कोरड्या हवामानाचा अंदाज असून ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यात उष्ण व दमट हवामानासह रत्नागिरी, सिंधुदुर्ग दुपारनंतर हलक्या पावसाची किंवा मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे.

--------

### विद्यार्थ्यांच्या गणवेशात घोळ घालणाऱ्या

आहे. गणवेशाचे दर्जेदार कापड, शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी वाटप, स्थानिक महिला बचत गटांकडून शिलाई तसेच गुणवत्तेची कठोर तपासणी, याबाबी अनिवार्य करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश मिळावा, यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. गणवेशावर समग्र शिक्षा अभियानाचा लोगो लावणेही बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या दोन गणवेशांपैकी एक गणवेश स्काऊट-गाईड उपक्रमाला अनुरूप असावा, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाची हाफ पँट आणि मुलींसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट असलेला पिनो फ्रॉक. तसेच, ज्या शाळांमध्ये सलवार कमीज असेल तर सलवार गडद निळ्या रंगाचा व कमीज आकाशी रंगाची अशी रचना असणार आहे. गणवेशाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडून नियमित तपासणी बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच, प्रयोगशाळेत नमुने तपासण्याची व्यवस्था करण्यात आली. गणवेशाची गुणवत्ता चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच पुरवठादाराला रक्कम दिली जाणार आहे. शासनाच्या अनुदानासोबतच अधिक दर्जेदार गणवेशासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांनी सीएसआर निधी व लोकसहभागातून अतिरिक्त निधी उभारण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

-----------

### माजलगावच्या मनुर शिवारात

या घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. काही नागरिकांनी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अवैध कत्तलीचा संशयही व्यक्त केला आहे. मात्र, संबंधित अवशेष नेमके कोणत्या प्राण्याचे आहेत, ते तेथे कोणी आणि कशासाठी टाकले, याबाबत रात्री उशिरापर्यंत अधिकृत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे विविध दाव्यांची सत्यता तपासाअंतीच स्पष्ट होणार आहे. याप्रकरणी पोलीस आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी घटनास्थळाची पाहणी करून नमुने तपासणीसाठी पाठवावेत तसेच संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दरम्यान, काही नागरिकांनी या घटनेमुळे धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप केला आहे. तथापि, अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचू नये, असे मतही काही नागरिकांनी व्यक्त केले. या घटनेबाबत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास आणि चौकशीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

--------------

### मागणी एकच, पण

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंतरवाली सराटी येथे आपले उपोषण सुरू केले आहे. मात्र, याच आंदोलनादरम्यान एक अत्यंत वेधक आणि परस्परविरोधी चित्र पाहायला मिळत आहे. मनोज जरांगे पाटील यांचे एकेकाळचे खंदे सहकारी, परंतु सध्याचे तीव्र विरोधक अमोल खुणे यांनीही याच मागण्यांसाठी समांतर आंदोलन छेडले आहे. विशेष म्हणजे, दोघांचीही मागणी मराठा आरक्षणाचीच असली, तरी त्यांच्या उपोषणाची पद्धत आणि ठिकाण पूर्णपणे वेगळे आहे आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील हे उन्हात बाजेवर (खाटेवर) बसून आंदोलन करत आहेत. दुपारी त्यांनी जमिनीवर बसूनच आंदोलन सुरू केले. दुसरीकडे, त्यांचे विरोधक अमोल खुणे यांनी थेट आपल्या हक्काच्या शेतात, रखरखत्या उन्हात अंगावरील कपडे काढून जमिनीवर बसून आमरण उपोषण सुरू केले आहे. "एक मराठा, लाख मराठा" चा बॅनर्स मागे लावून खुणे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह हे आंदोलन सुरू केले आहे. मागणी एकच असूनही हे दोन्ही नेते एकत्र न येता वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन करत असल्याने, मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील अंतर्गत मतभेद आणि संघर्षाची चर्चा आता संपूर्ण राज्यात रंगू लागली आहे. भर उन्हात जमिनीवर बसून करण्यात येणाऱ्या अमोल खुणे यांच्या या उपोषणामुळे आंदोलनाला एक नवीन वळण मिळाले आहे. आता या दोन्ही वेगवेगळ्या आंदोलनांची दखल सरकार कशा प्रकारे घेणार आणि मराठा समाजाच्या मागण्यांवर काय तोडगा निघणार, याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. प्रामुख्याने शनिवारी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून मंत्री विखे पाटील व आमदार प्रसाद लाड यांनी पुन्हा दुसऱ्यांदा येऊन मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. दुसरीकडे अमोल खुणे यांचे शेतात सुरू असलेल्या उपोषणाकडे माध्यम आणि शासन दोघांनीही दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

# तरुणांमध्येही हृदयविकार-डॉ.रोहन मालुरे

**बीड । प्रतिनिधी**

**आजकाल अनेकांमध्ये कोलेस्ट्रॉलची समस्या वाढताना दिसत आहे. केवळ प्रौढ व्यक्ती नाही, तर तरुणांमध्येही ही समस्या मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. सुरुवातीला साधा वाटणारा हा त्रास पुढे हृदयविकाराच्या गंभीर समस्यांचे कारण ठरू शकतो. आपल्या शरीरात कोलेस्ट्रॉल वाढते, तेव्हा शरीर काही ना काही संकेत देत असते.कोलेस्ट्रॉलचे दोन प्रकार असतात, यामध्ये एलडीएल आणि एचडीएल यांचा समावेश आहे. यापैकी एलडीएलला वाईट कोलेस्ट्रॉल म्हटले जाते. याचे कारण ते रक्तवाहिन्यांमध्ये साचून प्लाक तयार करते आणि हृदयाच्या समस्यांचा धोका वाढवते, तर एचडीएल चांगले कोलेस्ट्रॉल मानले जाते. रक्तात एलडीएल कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढले की, हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो. ही समस्या अचानक वाढते, सुरुवातीला कोणतीही ठळक लक्षणे दिसत नाहीत.**



१) छातीत दुखणे : छातीत दुखणे हे वाढलेल्या कोलेस्ट्रॉलचे लक्षण आहे. एलडीएल मुळे हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक साचतो त्यामुळे त्या अरुंद होतात. अशावेळी छातीत दडपण, जळजळ असा त्रास होतो. त्याचप्रमाणे हे दुखणे हात, मान, जबडा किंवा पाठीपर्यंत पसरू शकते.

२) त्वचेवर डाग दिसणे : त्वचेवर दिसणारे पिवळसर डाग किंवा गाठी यांच्याकडे दुर्लक्ष करू नये. हेदेखील उच्च कोलेस्ट्रॉलचे एक लक्षण आहे. हे डोळ्यांच्या आसपास, कोपर, गुडघे, बोटांच्या सांध्यांवर किंवा टाचांवर दिसू शकतात. शरीरात जास्त एलडीएल साचल्यामुळे हे डाग तयार होतात. अशावेळी आहारात बदल करूनही समस्या दूर करता येते.

३)श्वास घेण्यास त्रास होणे : श्वास घेण्यास त्रास होणे हाही एक संकेत असू शकतो.रक्तवाहिन्या अरुंद झाल्यामुळे हृदयाला जास्त मेहनत घ्यावी लागते. परिणामी तुमच्या शरीराला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे जिने चढताना, वेगाने चालताना किंवा झोपल्यावरही श्वास घ्यायला त्रास होऊ शकतो.

४) पायात वेदना होणे : तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पायात वेदना किंवा आकडी येणे (इंटरमिटंट क्लॉडिकेशन) हेदेखील एलडीएल कोलेस्ट्रॉल वाढल्याचे लक्षण असू शकते. यामध्ये चालताना पोटऱ्या, मांड्या किंवा कंबरेमध्ये वेदना होतात.ङ्गङ्गहे रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे होते आणि यामुळे चालण्याची क्षमतादेखील कमी होते.सतत थकवा जाणवणे

५) सतत थकवा जाणवणे हेदेखील दुर्लक्षित करू नये. शरीराला पुरेसा रक्तपुरवठा न झाल्यामुळे स्नायूंना व अवयवांना पोषण मिळत नाही. त्यामुळे व्यक्तीला सतत थकल्यासारखे वाटू लागते. हा थकवा आराम करूनही कमी होत नाही.

६) स्मरणशक्ती कमी होणे: ज्या व्यक्तीचे वाईट कोलेस्ट्रॉल वाढलेले असते त्या व्यक्तीला स्मरणशक्ती कमी होणे, डोकेदुखी किंवा ब्रेन फॉग सारखी लक्षणंही दिसू शकतात. मेंदूकडे जाणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथ निर्माण झाल्यामुळे लक्ष केंद्रित करणे कठीण होते. अशावेळी त्या व्यक्तीला चक्कर येण्याचा त्रासही होऊ शकतो.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ३१ मे २०२६


# विळ्याने हल्ला, काठ्यांनी बेदम मारहाण तब्बल दहा वर्षांनंतर आरोपींना शिक्षा

## आष्टी न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल; तीन आरोपी दोषी, एका महिलेची निर्दोष मुक्तता

आष्टी । प्रतिनिधी
आष्टी । प्रतिनिधी

शेतातील किरकोळ वादातून विळ्याने प्राणघातक हल्ला करत काठ्यांनी बेदम मारहाण केल्याप्रकरणी आष्टी न्यायालयाने तब्बल दहा वर्षांनंतर महत्त्वपूर्ण निकाल देत तीन आरोपींना दोषी ठरवून शिक्षा सुनावली. तर एका महिला आरोपीची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

आरसीसी क्र. १५/२०१७ या प्रकरणाचा निकाल देताना न्यायालयाने आरोपी सचिन विठ्ठल मुटकुळे, विठ्ठल भाऊसाहेब मुटकुळे आणि मंगळ विठ्ठल मुटकुळे यांना दोषी ठरविले. आरोपी मालन भाऊसाहेब मुटकुळे यांची मात्र निर्दोष मुक्तता करण्यात आली.



प्रकरणातील माहितीनुसार, १० सप्टेंबर २०१६ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास फिर्यादी बबन मुटकुळे यांच्या पत्नी शेतातील बांधावर गवत कापत असताना आरोपींनी वाद घालून तिच्यासोबत धक्काबुक्की व मारहाण केली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर बबन मुटकुळे घटनास्थळी गेले असता आरोपींनी त्यांच्यावरच हल्ला चढविला.

यावेळी आरोपी सचिन मुटकुळे याने हातातील विळ्याने फिर्यादीच्या डोक्यावर व नाकावर वार करून गंभीर दुखापत केली. तर इतर आरोपींनी काठ्यांनी बेदम मारहाण करून जखमी केले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने सादर केलेले साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल, जप्ती पंचनामे आणि इतर दस्तऐवजी पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरले. आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध झाल्याचे नमूद करत न्यायालयाने शिक्षा सुनावली.

न्यायालयाने आरोपी सचिन विठ्ठल मुटकुळे यास भारतीय दंड संहितेच्या कलम ३२५ अंतर्गत ११ महिने सक्तमजुरी व ५ हजार ५०० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच आरोपी सचिन मुटकुळे, विठ्ठल मुटकुळे आणि मंगळ मुटकुळे या तिघांना कलम ३२३ अंतर्गत प्रत्येकी २ महिने सक्तमजुरी व प्रत्येकी १ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

सरकारी पक्षाची भक्कम बाजू

या प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. विशाल संजय गव्हाळे यांनी प्रभावीपणे सरकार पक्षाची बाजू मांडली. साक्षीदारांच्या साक्षी, वैद्यकीय पुरावे आणि तपासातील कागदपत्रांच्या आधारे त्यांनी आरोपींचा गुन्हा न्यायालयात ठोसपणे सिद्ध केला. त्यानंतर न्यायालयाने दोषी आरोपींना शिक्षा सुनावत न्यायदान केले. या निकालामुळे गंभीर मारहाण प्रकरणातील आरोपींना कायद्याचा फास अखेर आवळला गेला असून, न्यायालयाच्या या निर्णयाचे कायदेवर्तुळातून स्वागत करण्यात येत आहे.



## माजलगाव भाजपा संपर्क कार्यालयात सावरकर जयंती उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

प्रखर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी संपर्क कार्यालय माजलगाव येथे प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके म्हणाले स्वातंत्र्यवीर सावरकर हे प्रखर राष्ट्रभक्त आणि समाजजागृतीचे प्रेरणास्थान होते तर भाजपा युवा नेते अभय होके म्हणाले

सावरकरांचे राष्ट्रनिष्ठ विचार, त्यागमय जीवन आणि समाजप्रबोधनाचे कार्य आजही तरुणाईसाठी प्रेरणेचा अखंड दीपस्तंभ आहे , याप्रसंगी सावरकर यांच्या आठवणीला उजाळा देत भारतीय जनता पार्टीचे तालुक्याचे शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी सावरकर यांनी देशाप्रती समर्पण भावनेने केलेले कार्य हे कोणीही विसरू शकणार नाही असे सांगितले. याप्रसंगी कीट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्ष रूपाली कचरे, पात्रुड मंडळाचे तालुका अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके यांनीही सावरकरांचे विविध आठवणीला उजाळा देत विचार मांडून मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पवन मोगरेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कल्याण शेप यांनी केले.या कार्यक्रम प्रसंगी उपाध्यक्ष शुभम महात्मे,रामेश्वर चव्हाण,संतोष जाधव,किशोर सावंत,सुनील दळवी,सतीश जोशी,रवि वाकळे, गोपाळ कुलकर्णी, सह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अधिक मासानिमित्त प्रभू विश्वकर्मा उत्सव समितीच्या वतीने 'सामूहिक धोंडे जेवण व समाज स्नेहमेळावा'

बीड । प्रतिनिधी

हिंदू धर्मातील अधिक मासाचे धार्मिक आणि अध्यात्मिक महत्त्व लक्षात घेऊन, प्रभू विश्वकर्मा उत्सव (जन्मोत्सव) समिती, बीडच्या वतीने ३१ मे २०२६, रविवार रोजी तळेगाव येथील प्रभू विश्वकर्मा मंदिर परिसरात विशेष 'सामूहिक धोंडे जेवण व समाज स्नेहमेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे.

अधिक मासात जावयांना धोंडे जेवण (विशेष मेजवानी) देण्याची आपली जुनी धार्मिक परंपरा आहे. ही परंपरा अधिक अर्थपूर्ण आणि समाजहिताची व्हावी, या उद्देशाने या सामूहिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने बीड शहरातील सर्व समाज बांधव, कारागीर, हार्डवेअर आणि प्लायवूड व्यावसायिक एकत्र येणार आहेत.

प्रभू विश्वकर्मा उत्सव समितीच्या वतीने बीडमधील सर्व समाज बांधवांना नम्र आवाहन करण्यात आले आहे की, या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमात सहभागी होण्यासाठी आपण आपल्या जावयांना, तसेच नातेवाईक व सगेसोयऱ्यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करावे.समितीने सर्व समाज बांधवांना एक महत्त्वाची सूचना केली आहे की, ३१ मे रोजी कोणीही आपापल्या घरी धोंडे जेवणाचा स्वतंत्र कार्यक्रम आयोजित करू नये. त्याऐवजी, सर्व समाज बांधवांनी आपल्या जावयांसह आणि सहकुटुंब, सहपरिवार या सामूहिक धोंडे जेवण कार्यक्रमासाठी उपस्थित राहून सामाजिक एकोपा वाढवावा आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी. बीडच्या समस्त समाज बांधवांनी या आगळ्या-वेगळ्या स्नेह मिलन कार्यक्रमास उपस्थित राहून सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रभू विश्वकर्मा उत्सव (जन्मोत्सव) समिती, बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

## खुनाचा प्रयत्न, गंभीर गुन्ह्यातील चार आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळला-ॲड. अविनाश गंडले

**बीड । प्रतिनिधी**

प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी की, गु.र.क्र.१९७/२०२६ मध्ये फिर्यादी संदीप कैलास कोकणे (रा. धोंडराई, ता. गेवराई) यांच्यावर आरोपींनी जीवघेणा हल्ला करून गंभीर मारहाण केली होती. या हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्याला तब्बल २४ टाके पडले असून त्यांच्यावर रुग्णालयात मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या घटनेनंतर आरोपी फरार झाले होते.

गेवराई पोलीस ठाणे हद्दीतील खुनाचा प्रयत्न व गंभीर मारहाण प्रकरणातील चार आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. तदर्थ प्रथम जिल्हा न्यायाधीश, बीड यांनी फेटाळून लावला आहे. या आदेशामुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये न्यायालय आरोपींच्या वर्तनाची आणि गुन्ह्याच्या परिणामांची गांभीर्याने दखल घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणातील आरोपी देविदास लक्ष्मण प्रधान, बाळा उर्फ अजिनाथ प्रकाश प्रधान, संदीप राम प्रधान आणि पंढरीनाथ मधुकर प्रधान यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता.

यावेळी आरोपींची गुन्हेगारी प्रवृत्ती, फिर्यादीला दिलेल्या कथित जीवे मारण्याच्या धमक्या, तसेच आरोपी फरार असतानाही त्यांच्याविरोधात प्रभावी कारवाई न झाल्याच्या बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. आरोपींना जामीन मंजूर झाल्यास फिर्यादीच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, तसेच साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता असल्याचेही मांडण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे विचारात घेतल्यानंतर मा. प्रथम तदर्थ जिल्हा न्यायाधीश, बीड यांनी चारही आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. या आदेशामुळे खुनाचा प्रयत्न, गंभीर मारहाण आणि पीडितास धमकावण्यासारख्या गंभीर आरोपांमध्ये न्यायालयाने कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येते. आरोपींची संभाव्य दहशत, पीडिताच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणि तपास प्रक्रियेवर होणारा परिणाम यांचा विचार करून दिलेला हा आदेश कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे. फिर्यादीच्या वतीने ड. अविनाश गंडले यांनी सखोल अभ्यास करून न्यायालयासमोर प्रभावी युक्तिवाद मांडला. ड. राजेश शिंदे यांनी कायदेशीर बाबी तसेच पुरावे एकत्रित करून महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. ड. अविनाश गंडले यांना या कामी ड. ईमरान पटेल, ड. बप्पा माने,ड. सुरक्षा जावळे, ड. किरण मस्के, ड. राजेश शिंदे, ड. सचिन गिरी, ड. शुभम सरवदे, ड.अनिकेत गंडले, ड. रवींद्र बरडे यांनी सहकार्य केले. गंभीर गुन्ह्यांमध्ये पीडिताच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत न्यायालयाने आरोपींना दिलासा नाकारला हा आदेश न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा ठरला आहे.

## योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक, अंबाजोगाई येथील विद्यार्थ्यांची १२ आठवड्यांच्या औद्योगिक प्रशिक्षण(इंटर्नशिप) करिता नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली असून, विद्यार्थी संबंधित उद्योगांमध्ये रुजू झाले आहेत.



महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (एम एस बी टी ई) अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, त्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा विकास व्हावा तसेच रोजगारक्षमतेत वाढ व्हावी या उद्देशाने पॉलिटेक्निक अभ्यासक्रमातील द्वितीय वर्ष संपल्यानंतर १२ आठवड्यांच्या औद्योगिक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. याच नुसार योगेश्वरी पॉलिटेक्निकमधील विद्यार्थ्यांना इंड्युरन्स टेक्नॉलॉजीज लिमिटेड, संभाजीनगर, अँडविक हाय-टेक प्रा. लि.पुणे, टाटा मोटर्स, पुणे, यश कन्स्ट्रक्शन, अंबाजोगाई तसेच श्री सॉफ्टवेअर सोल्युशन, सातारा या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये प्रशिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन नियोजन, देखभाल व दुरुस्ती, औद्योगिक सुरक्षा, व्यवस्थापन कौशल्ये तसेच प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेचा अनुभव मिळणार आहे प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना दरमहा १७ हजार रुपये मानधन देखील मिळणार आहे. अशी माहिती पॉलिटेक्निक विभागाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. शाम गडदे यांनी दिली. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड. जगदीश चौसाळकर, सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक प्रताप पवार, योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी नामांकित उद्योगांमध्ये औद्योगिक प्रशिक्षणाच्या स्वरुपात उपलब्ध होत असल्याने, त्यांचा आत्मविश्वास, तांत्रिक कौशल्ये आणि रोजगारक्षमता वाढण्यास मोठी मदत होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला तसेच उद्योग क्षेत्रातील विश्वासार्हतेला अधिक बळ मिळत आहे.

-चंद्रशेखर बर्दापूरकर,
अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई

## राजमाता अहिल्याबाई होळकर जन्मोत्सवाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

सकल धनगर समाज, माजलगाव विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम दिनांक ३१ मे रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे पिवळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार असून हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता समाजातील महिलांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महाआरती तसेच अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजातील महिला भगिनींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भाजपा विधानसभा प्रमुख माधव निर्मळ हे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले हे राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गवते, सरपंच राज अर्जुन, सरपंच नारायण भले उपस्थित राहतील.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून बंडू खांडेकर, ज्ञानेश्वर सरवदे, यशवंत गायके, अण्णासाहेब वगरे, अशोकराव डोणे, बबनराव सरवदे, भगवानराव सरवदे, ॲड. विनायकराव लवटे, सुभाषराव गडदे, डॉ. भारत वाघमोडे, लक्ष्मीकांत सोन्नर, नारायण सातपुते, मुक्तीराम आबुज, संजय धरपडे, बाळासाहेब सोनसळे, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, विशाल देवकते, संपतराव हराळ, भागवत गायकवाड ,अँड.जयराम सजगणे, रणजीत रुपनर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या जन्मोत्सव सोहळ्यास माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, संतोष देवकते, जयंत अध्यक्ष अशोक चोरमले, रामेश्वर शिंदे, रणजीत चोरमले, सुरेश देवकते, आप्पासाहेब तायडे, प्रथमेश बोरखडे, अशोक देवकते, अर्जुन भुतकर, हनुमान गावडे, हरिचंद्र कुंडकर, गणेश हजारे, दत्ता मुळे, दिगंबर घुमरे, अनिल आवाड, अर्जुन दिवटे, सुभाष गवळी, अशोक गवळी, हनुमान बाबरे, रामेश्वर काळे, सचिन वगरे, रामेश्वर सरवदे यांनी केले आहे.

## ज्ञान आणि संस्कारांच्या शिदोरीवर आयुष्याचा नवीन प्रवास यशस्वी करा -डॉ.आदिती सारडा

बीड । प्रतिनिधी

निरोप समारंभ हा केवळ आठवणींना उजाळा देणारा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा प्रसंग नसून, तो नवीन संधींच्या सुरुवातीची भावना निर्माण करणारा एक भावनिक क्षण असतो. या पवित्र प्रांगणात तुम्ही जे संस्कार आणि ज्ञान मिळवले आहे, तीच तुमच्या आयुष्याची खरी शिदोरी आहे. या शिदोरीच्या बळावर भविष्यातील नवीन प्रवासात यश मिळवून महाविद्यालयाचे नाव मोठे करा, असे आवाहन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य फार्मसी व आदित्य डी.फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. दि. ११ मे रोजी सायंकाळी ६ वाजता महाविद्यालय परिसरात अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात हा सोहळा पार पडला. सुमारे तीन तास चाललेल्या या कार्यक्रमाला ३०० हून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदित्य फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.डी.आर.पवार यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी गुरुकिल्ली दिली. ते म्हणाले, स्वप्न



आदित्य फार्मसी महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

पाहणे सोपे असते, पण ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अपार मेहनत आणि सातत्याची गरज असते. विद्यार्थ्यांनी भविष्यात मोठ्या पदांवर पोहोचून देशाच्या विकासात योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. आदित्य डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर. शिंदे म्हणाले, निरोप म्हणजे कायमचे दूर जाणे नव्हे, तर नवीन जबाबदाऱ्यांकडे वाटचाल करणे होय. महाविद्यालयाचे दरवाजे तुमच्यासाठी नेहमीच उघडे राहतील. आयुष्यात मोठे होताना माणुसकी जपा,अशी भावनिक साद त्यांनी विद्यार्थ्यांना घातली.

या प्रसंगी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आपल्या प्रवासाला उजाळा दिला. विद्यार्थी भावना शिलीमकर मनोगत व्यक्त करताना, शैक्षणिक प्रवासात महाविद्यालय आणि संस्था कशाप्रकारे नेहमी पाठीशी खंबीरपणे उभी राहिली, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तर आदित्य मुंजाळ ने प्राध्यापकांच्या मेहनतीचे कौतुक करत, महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर कसा भर दिला जातो,याचे अनुभव कथन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. डी. आर. पवार, प्राचार्य डॉ. आर. आर. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.गोविंद मुंडे, डॉ. देवेश चव्हाण, डॉ. विशाल सनान्से, प्रा. प्रसाद चव्हाण, प्रा. मुंजाजी मुळे, प्रा.चैतन्य कुटे, प्रा. शितल शिंदे, प्रा. रोहिणी जाधव, प्रा. शुभम रांदड, प्रा. स्वाती धस, प्रा. शिवाजी तोरकड यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन २०२३ बॅचच्या ऐश्वर्या घुघे व रुपाली मुळे यांनी केले, तर २०२३ बॅचचा विद्यार्थी अक्षय मुंढे याने आभार मानले.

पान ६ वरुन...

### अन् तुला पाचवा जिल्हाप्रमुख

धनंजय पापा सोळंके यांच्या नेतृत्वाला पक्षश्रेष्ठींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे.बैठकीत बोलताना धनंजय पापा सोळंके यांनी माजलगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांसाठी जागा उपलब्ध करून निधी मंजूर करण्यात शिवसेनेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिल्याचे सांगितले. शिवसैनिकांच्या हक्काचा निधी, विकासकामे आणि संघटनात्मक बळकटीसाठी संघर्ष कायम राहील,तसेच शिवसैनिकांवरील अन्याय सहन केला जाणार नाही,अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली.या आढावा बैठकीस मंत्री ना.भरत गोगावले,खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्कप्रमुख मनोज शिंदे,माजी खासदार आनंद परांजपे,युवासेना नेते अभिमन्यू खोतकर,रुपेश कदम यांच्यासह जिल्हा,तालुका व शहरस्तरीय पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.बैठकीत संघटन विस्तार, आगामी निवडणुकांची तयारी, शिवसैनिकांच्या समस्या आणि विकासकामांचा आढावा घेण्यात आला.खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीने बीड जिल्ह्यातील शिवसेना संघटनेला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**जिल्हा शिवसेनेत फेरबदलाचे वारे**

जे शिवसैनिकांच्या मनात ते माझ्या ध्यानात खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांचे धनंजय पापा सोळंके यांना उद्देशून थेट सवाल तुला जिल्हाप्रमुख व्हायचं आहे का शिवसंवाद बैठकीत खासदार श्रीकांत शिंदे यांचे सुतवाच

### २५ तोळे सोने व गॅस

कागदपत्रांचे बारकाईने परीक्षण केल्यानंतर न्यायालयाने आरोपीविरुद्धचा छळाचा आरोप सिद्ध झाल्याचा निष्कर्ष काढला.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक अशोक दगडू केदार यांनी केला. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. गव्हाळे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपीस दोषी धरत शिक्षा सुनावली. महिलांवरील कौटुंबिक अत्याचार व हुंडाबळीविरोधातील कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचा संदेश या निकालातून गेला असून, वैवाहिक छळाच्या प्रकरणांमध्ये पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायव्यवस्था कटिबद्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

### खा. सोनवणे यांच्या

मोठ्या प्रमाणात प्रीमियम भरूनही शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे.दरम्यान, शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली दि १ जून सोमवार रोजी सकाळी १०:०० वाजता केज येथील धारुर चौक ते खासदार सोनवणे यांच्या कार्यालयापर्यंत शेतकरी एकजुटीने जाणार आहेत. सोनवणे यांच्या कार्यालयात शेतकऱ्यांच्या पीक विमा मंजुरीसंदर्भातील मागण्या मांडण्यात येणार असून त्यांना निवेदन देण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील २०२५ सालच्या खरीप पीक विमा योजनेअंतर्गत विमा भरलेल्या तब्बल १ लाख ७७ हजार ३५१ शेतकऱ्यांनी पीक विमा मंजुरीसाठी एकजूट होऊन आपल्या हक्कासाठी लढा उभारण्याची गरज असल्याचे मत शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी व्यक्त केले.

### रस्त्यासाठी बेलेश्वरवस्तीवरील

भूमिका घेत मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत व तलाठी गणपत पोतदार यांना तातडीने स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश दिले. शेतरस्ता बंद झाल्यामुळे पेरणीपूर्व मशागत, खत-बियाणे वाहतूक तसेच दैनंदिन ये-जा यामध्ये अडथळे निर्माण होत असल्याने रस्ता तातडीने मोकळा करून द्यावा, अशी मागणी बालासाहेब ढास, सदाशिव ढास, महादेव ढास, लक्ष्मण ढास, अभिमान ढास, रंजित ढास, बाळू ढास, मल्हारी ढास, जबाबदारी ढास, मंगल ढास, लताबाई ढास, सोयराबाई ढास, पुष्पा ढास, रत्ना ढास, संजना ढास, कालिदास ढास व विमलबाई ढास यांनी केली.

### शिवसंवाद दौऱ्यातून संघटन

सुनील धांडे यांच्यासह गेवराई व आष्टी मतदारसंघातील सर्व अंगीकृत संघटनांचे जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, जिल्हा संघटक, युवासेनेचे जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी, व्हीजेएनटी आघाडीचे पदाधिकारी, विभागप्रमुख, शाखाप्रमुख, बीएलए-२ तसेच असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसंवाद दौऱ्याच्या माध्यमातून संघटना अधिक मजबूत करण्याबरोबरच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रभावी नियोजन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### काडीवडगाव येथे जयसिंग

भाईजा या जोडीने रोख रकम १५ हाजार रु मानच्या दोन दाल,सहवा क्रं पवन आणि कार्टून या जोडीने पटकावला त्यांना रोख रक्कम ११ हजार रु मानाच्या दोन ढाल,सातवा क्रंमांक संज्या आणि बबल्या या जोडीने त्यांना रोख रकम ७ हजार व मानाच्या दोन ढाल,आठवा क्रंमांक नायक आणि बल्मा या जोडीने पटकावला त्यांना रोख ५ हजार व मानाच्या दोन ढाल पारितोषिक उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते देण्यात आले.

# नाफेडच्या कांदा खरेदीवर प्रश्नचिन्ह

## आकडेवारी सार्वजनिक करा, कांदा उत्पादक संघटनेची मागणी

नाशिक / प्रतिनिधी

नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात व्यापाऱ्यांकडून न करता, थेट शेतकऱ्यांकडून करण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली. या मागणीवर केंद्राने सहमती दर्शवली. आता महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांनी, नाफेड आणि एनसीसीएफ यांच्याकडून होत असलेल्या खरेदी प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता असायला हवी, अशी मागणी केली आहे. तसेच, गेल्या काही महिन्यांत कवडीमोल भावात ज्या शेतकऱ्यांना कांदा विकण्याची वेळ आली, त्यांना तातडीने दिलासा आणि नुकसानभरपाई मिळावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष भारत दिघोळे यांनी, नाफेडकडून सुरू असलेल्या कांदा खरेदीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील विविध बाजार समित्यांतून आणि महाराष्ट्रातील इतर कांदा उत्पादक भागांतून नाफेडने प्रत्यक्षात किती कांद्याची खरेदी केली? याची माहिती द्यावी. खरेदी प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता राहावी यासाठी नाफेडने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या कांद्याची आकडेवारी दररोज सार्वजनिक करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. कांदा खरेदी प्रक्रिया खरोखरच सर्व प्रमुख उत्पादक जिल्ह्यांत राबवली जात आहे का? तसेच त्याचा त्याचा लाभ केवळ मर्यादित वर्गापर्यंत पोहोचत आहे का?, असे प्रश्न कांदा उत्पादक संघनेने उपस्थित केले आहेत. राज्यातील कांदा उत्पादकांना अनेक महिने त्यांचा शेतमाल खर्चापेक्षा कमी भावात विकाला लागला. पण शेतकऱ्यांच्या संकटाच्या परिस्थितीत सरकारी यंत्रणा निष्क्रिय राहिल्या, असा आरोप त्यांनी केला. ''ज्या शेतकऱ्यांना वर्षाच्या सुरुवातीला कांदा कवडीमोल भावाने विकावा लागला, त्यांना सध्याच्या खरेदी दराच्या म्हणजेच प्रतिक्विंटल १,५८० रुपये दराच्या प्रमाणात नुकसान भरपाई अथवा अनुदान मिळावे,'' असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. नाफेड आणि एनसीसीएफने बाजार समितीनिहाय किती कांदा खरेदी केला तसेच तो किती शेतकऱ्यांकडून घेतला आणि खरेदीचा दर यासह दैनंदिन खरेदीचा तपशील ऑनलाइन जाहीर करावा, असे त्यांनी सूचित केले आहे. त्यांनी कांद्याची खरेदी, साठवणूक, प्रक्रिया आणि निर्यात प्रक्रिया पद्धतशीरपणे आणि शेतकरी हिताच्या दृष्टीने करण्यासाठी कांदा महामंडळाची स्थापना करण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला आहे. कांद्याची निर्यात बंदी, त्याच्यावर निर्यात शुल्क लागू करणे आणि बाजार हस्तक्षेप उपाययोजना यांसारख्या शेवटच्या क्षणी घेतलेल्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दरवर्षी मोठा आर्थिक फटका बसत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी कांदा उत्पादकांसाठी कायमस्वरूपी भाव संरक्षण यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.




# जनावरांना गूळ खाऊ घालण्याचे फायदे व तोटे

बरेच पशुपालक आपल्या जनावरांना गुळ खाण्यासाठी देतात. गुळामध्ये कॅल्शियम जास्त असते असे, अनेक पशुपालकांना वाटते. परंतु गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण किती असते व तो किती व कधी खायला द्यावा, याबाबत जाणून घेतल्यास जनावरांच्या वाढीसाठी याचा मोठा फायदा होऊ शकतो.

गुळामध्ये असणारे अन्नघटक : गुळामध्ये ८० टक्के सुक्रोज, १० टक्के ग्लुकोज व फ्रुक्टोज, ५ ते ७ टक्के पाणी आणि उरलेले ३ टक्के क्षार घटक असतात. १०० ग्रॅम गुळामध्ये ४० ते १०० मि.ग्रॅ. कॅल्शियम असते. म्हणजे १ किलो गुळ जनावरांना खाऊ घातल्यास फक्त १ ग्रॅम कॅल्शियम मिळते. त्याचबरोबर मॅग्नेशियम, फॉस्फरस, सोडियम यांचे देखील प्रमाण ३० ते १०० मि.ग्रॅ प्रति १०० ग्रॅम असते. लोह १०-१३ मि.ग्रॅ. प्रति १०० ग्रॅम असते. दुधाळ जनावरांना २० ते २५ मि.ग्रॅ. लोह आवश्यक असते. त्यामुळे गुळामधून जनावरांना लोह चांगल्या प्रमाणात मिळते. परंतु हा गुळ लोखंडाच्या कढईत पारंपरिक पद्धतीने बनवला असेल तरच त्या गुळामध्ये लोहाचे प्रमाण चांगले असते. गुळातील अन्नघटकाचा विचार केला तर गुळामधून जनावरांना कॅल्शियम नगण्य प्रमाणात मिळते.


जनावरांना गुळ खायला द्यावा की नाही : गुळामध्ये शर्करेचे प्रमाण जास्त असल्याने जनावरांना थोड्या प्रमाणात गुळ खायला दिल्याने लगेच ऊर्जा मिळते. परंतु जनावरांना गरजेपेक्षा जास्त म्हणजे २०० ग्रॅम पेक्षा जास्त गुळ खायला दिला आणि त्याचबरोबर सकस हिरवा चारा दिला तर जनावरांच्या पोटामध्ये शर्करेचे प्रमाण वाढते. पोटातील जिवाणू लॅक्टीक असिड मोठ्या प्रमाणावर तयार करतील, त्यामुळे असिडोसिस होण्याची शक्यता असते. असिडोसिसमुळे जनावरांचे पचन बिघडते. त्यामुळे जनावरांना गरज असेल तरच व प्रमाणात गुळ देणे महत्त्वाचे आहे.

जनावरांना गुळ कधी खाऊ घालावा : जनावरे विल्यानंतर जनावरांना मोठ्या प्रमाणात ऊर्जा मिळणे गरजेचे असते. कारण जनावर विण्याच्या अगोदर कमी प्रमाणात चारा खाते किंवा चारा खात नाही. वासराचे वजन जनावराच्या कोटीपोटावर पडल्यामुळे जनावराची चारा खाण्याची व रवंथ करण्याची क्षमता कमी झालेली असते. जनावर विल्यानंतर गर्भाशयातून रक्तस्राव होतो त्यामुळे जनावरे व्यायलानंतर जनावराला लवकर ऊर्जा मिळण्यासाठी गुळ खायला देणे फायदेशीर असते.

गुळ कसा खायला द्यावा : जनावर व्यायल्यानंतर कोमट पाण्यामध्ये २०० ग्रॅम गुळ विरघळवून जनावरांना द्यावा. त्याचबरोबर २०० ते २५० ग्रॅम तृणधान्याच्या लापशीमध्ये १०० ग्रॅम गुळ घालून व्यायलेल्या जनावराला द्यावा. जनावरांना बनवलेल्या लापशीमध्ये २०० ते २५० ग्रॅमपेक्षा जास्त तृणधान्याचे प्रमाण असू नये. गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण हे फार कमी असते, त्यामुळे जनावरांमधील कॅल्शियमची कमतरता भरून काढण्यासाठी गुळाचा वापर करू नये.



# कापूस पिकावरील बोंडसड रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याचे उपाय!



सततचा आणि जास्त पाऊस, ढगाळ वातावरण आणि हवेतील अति आर्द्रता यामुळे कापूस पिकात हिरव्या बोंडातील आतील भाग सडण्याची समस्या दरवर्षी दिसून येते. प्रामुख्याने बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत हे आढळते. यालाच बोंडसड असे म्हणतात. अशी बोंडे बाहेरून निरोगी दिसत असली तरी अशी हिरवी बोंडे फोडून बघितल्यावर आतील रुई व बिया प्रामुख्याने पिवळसर गुलाबी ते लाल रंगाच्या होऊन सडल्याचे आढळते. साधारणतः बोंडातील एक ते दोन कप्पे, तर काही ठिकाणी संपूर्ण बोंड सडल्याचे आढळले. अनेक ठिकाणी बोंडसडचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर आढळून येतो. त्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

बोंडसड रोगाची कारणे : जास्त पाऊस, सतत ढगाळ वातावरण आणि हवेतील अति आर्द्रता बोंडसड साठी पोषक वातावरण आहे. रोगकारक बुरशी, जीवाणू, रस शोषक ढेकूण व किडी यांच्याद्वारे या रोगाचा प्रसार होतो.

बाह्य बोंडसड/बोंडाच्या पृष्ठभागावर होणारा संसर्ग : या प्रकारात मुख्यत: काही रोगकारक बुरशी, कुजलेल्या अवशेषांवर जगणारे सूक्ष्मजीव तसेच काही प्रमाणात बोंडावरील जीवाणू कारणीभूत असतो.

आंतरिक बोंडसड : कमी प्राणवायु अवस्थेत तग धरणारे जीवाणू, रोगकारक जीवाणू आणि काही प्रमाणात रोगकारक बुरशीच्या संसर्गामुळे आंतरिक बोंडसड होते. अशी बोंडे बाहेरून निरोगी दिसतात. मात्र आतील रुई पिवळसर-गुलाबी ते लाल-तपकिरी रंगाची होऊन सडते. विकसित अवस्थेतील बियासुद्धा सडल्याचे आढळतात.

बोंडसड रोगाचे एकात्मिक नियंत्रण : सिंचन आणि नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळावा. चांगल्या व्यवस्थापन पद्धतींद्वारा कापूस पिकाची अतिवाढ रोखावी. लाल रंगाच्या ढेकणापासून पिकाचे संरक्षण करावे.बोंडाच्या पृष्ठभागावर होणारा बुरशीचा संसर्ग रोखण्यासाठी खालील प्रमाणे फवारणी करावी. कार्बेन्डाझिम (१२ टक्के) + मॅन्कोझेब (६३ टक्के डब्ल्यू.पी.) (संयुक्त बुरशीनाशक) ०.३ ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारणी करावी. किंवा कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यू.पी.) ०.४ ग्रॅम किंवा मेटीराम (५५ टक्के) + पायराक्लोस्ट्रोबिन (५ टक्के डब्ल्यू.जी.) २ ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ई.सी.) १ मि.लि. किंवा अ‍ॅझोक्सीस्ट्रॉबीन (१८.२ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू) डायफेनोकोनॅझोल (११.४ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू एस.सी.) (संयुक्त बुरशीनाशक) १ मि.लि. किंवा प्रोपीनेब (७० टक्के डब्ल्यू.पी.) २.५ ते ३ ग्रॅम आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशक बदलून दुसरी फवारणी करावी.

# मत्स्यपालनात आहार म्हणून शेवग्याच्या पानांचा वापर फायदेशीर!

मत्स्यपालन करताना माशांना वेगवेगळ्या प्रकारचा आहार दिला जातो, ज्यामुळे त्यांचे आरोग्य आणि वाढ चांगली होईल. परंतु तुम्हाला माहित आहे का की माशांसाठी मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने यापासून तयार केलेली पावडर एक उत्तम पर्याय आहे. मत्स्यपालनात आहारामध्ये मोरिंगा वापरल्याने मासे निरोगी राहण्यास आणि मत्स्यशेती सुरळीत चालण्यास मदत होऊ शकते.

'मोरिंगा' माशांसाठी सुपरफूड : मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरणे हे माशांसाठी एक प्रकारचे सुपरफूड आहे. त्यामुळे माशांची रोगप्रतिकार क्षमता वाढते. मोरिंगा पानांमध्ये मासे निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. त्यात दहा प्रकारचे अत्यावश्यक अमीनो ॲसिड असतात, जे प्रथिने बनवण्यास मदत करतात. याशिवाय यामध्ये अनेक प्रकारची जीवनसत्त्वे असतात. म्हणून जर आपण मोरिंगा माशांना खायला दिले तर ते अधिक निरोगी आणि मजबूत राहतील. हे कृत्रिम अन्नापेक्षा चांगले आहे कारण ते नैसर्गिक आहे आणि त्यात कोणतेही हानिकारक रसायने नसतात. मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरल्याने मासे निरोगी राहतील आणि मत्स्यपालकांनाही फायदा होईल.

मोरिंगापासून माशांना मिळतात प्रथिने : माशांच्या वाढीसाठी आणि पुनरुत्पादनासाठी प्रथिने अत्यंत आवश्यक आहेत. संशोधनात असे आढळून आले आहे की माशांच्या बाळांना किमान ३० टक्के प्रथिने आवश्यक असतात. सामान्यतः, मत्स्यपालक सामान्यतः माशांसाठी प्रथिनांचा स्रोत म्हणून फिश फूडचा वापर करतात परंतु, फिश फूडच्या वाढत्या मागणीमुळे, त्याच्या उत्पादनासाठी नैसर्गिक संसाधनांवरही दबाव वाढत आहे. अशा स्थितीत मत्स्य खाद्यामध्ये मोरिंगासारख्या पर्यायी प्रथिन स्त्रोतांचा वापर जलचर शेतीमध्ये वाढत आहे. मोरिंगामध्ये प्रथिने जास्त असतात आणि त्यात सर्व आवश्यक अमीनो ॲसिड असतात. त्यामुळे माशांच्या आहारासाठी मोरिंगा हा चांगला पर्याय आहे. मोरिंगा पानांच्या पावडरमुळे २५-३७ टक्के प्रथिने आहेत जे माशांच्या वाढीस मदत करतात आणि त्यांची रोग प्रतिकारशक्ती देखील वाढवतात. मत्स्यव्यवसायात मोरिंगाचे फायदे : मोरिंगा वनस्पतीच्या पानांमध्ये, बिया आणि सालामध्ये विविध प्रकारचे फायटोकेमिकल्स असतात, जसे की फ्लेव्होनॉइड्स, फेनोलिक ॲसिड आणि अँथ्राक्विनोन. हे घटक माशांचे आरोग्य सुधारण्यास, प्रतिकारशक्ती वाढविण्यास आणि त्वचेची चमक वाढविण्यास मदत करतात. एवढेच नाही तर पारंपारिक अँटीबायोटिक्स आणि रासायनिक औषधांना मोरिंगा वापरणे हा स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे. हे माशांच्या वाढीस, त्वचेचा रंग वाढण्यास मदत करते आणि कोणत्याही हानिकारक प्रभावाशिवाय रोगांशी लढण्यास मदत करते.



शोभेच्या माशांसाठी महत्त्वाचे : तिलापिया, सीब्रेम, गिबल कार्प आणि गप्पी यांसारख्या शोभेच्या माशांसाठी मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरणे खूप फायदेशीर आहे, कारण अभ्यासात असे आढळून आले आहे की जर माशांच्या आहारात १० ते १५% मोरिंगा समाविष्ट केले तर मोरिंगामध्ये कॅरोटीनोइड्स असतात ज्यामुळे माशांच्या त्वचेचा रंग गडद होऊ शकतो. तसेच याचा माशांच्या वाढीवर कोणताही वाईट परिणाम होत नाही. म्हणजेच, फिश फुडपेक्षा मोरिंगा हा प्रोटीनसाठी चांगला पर्याय मानला जाऊ शकतो. मोरिंगामध्ये एक विशेष घटक आढळतो, ज्याला फिनाईल आयसोथियोसायनेट म्हणतात. यात प्रतिजैविक गुणधर्म आहेत, ज्यामुळे माशे चांगले वाढतात आणि त्यांची मर कमी होण्यास मदत होते.

माशांच्या आहारात मोरिंगाचा वापर : मोरिंगा ची पाने नीट धुवून वाळवा आणि नंतर बारीक करून पावडर बनवा. ही पावडर माशांच्या आहारात मिसळता येते, त्यामुळे माशांना अधिक पोषक द्रव्ये मिळू शकतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२२३ : कालका नदीची लढाई : चंगीझ खान व पूर्व स्लाव्हिक सैन्यांमध्ये चकमक. मोंगोल सैन्याचा विजय.
१७२७ : फ्रान्स, ब्रिटन आणि नेदरलँड्स या देशांनी पॅरिस करारावर स्वाक्षरी केल्या.
१७५९ : अमेरिकेच्या पेनसिल्व्हेनिया प्रांतात नाटकांवर बंदी.
१७७४ : ब्रिटीश कालीन भारतात पहिल्या पोस्ट सेवा कार्यलयाची स्थापना करण्यात आली.
१७९० : अमेरिकेत १७९०चा कॉपीराईट कायदा लागू.
१८६७ : मुंबई इथे प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली.
१९१० : दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य.
१९१३ : अमेरिकेच्या संविधानातील १३वा बदल संमत.
१९२१ : अमेरिकेतील तल्सा शहरात वांशिक दंगे. ३९हून अधिक ठार.
१९२१ : आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी सुरेश हरिप्रसाद जोशी यांचा जन्म.
१९२४ : सोवियेत संघाने बाह्य मोंगोलियावरील चीनचे आधिपत्य मान्य केले.
१९२७ : फोर्ड मोटर कंपनीची मॉडेल टी प्रकारची शेवटची कार तयार झाली. या प्रकारच्या एकूण १,५०,०७,००३ कार तयार केल्या गेल्या.
१९३५ : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेट्टा येथे झालेल्या ७.७ रिच्टर तीव्रतेच्या भूकंपात ५६,००० लोक ठार झाले.
१९४२ : दुसरे महायुद्ध : जपानच्या पाणबुड्यांनी सिडनीवर हल्ला केला.
१९४२ : दुसरे महायुद्ध : लुफ्तवाफेने इंग्लंडमधील कोव्हेन्ट्री गावावर बॉम्बफेक केली.
१९५२ : जनरल ड्वाइट डी. आयझेनहॉवर अमेरिकन सैन्यातून निवृत्त.
१९५२ : संगीत नाटक अकादमी ची स्थापना.
१९६१ : दक्षिण आफ्रिका प्रजासत्ताक झाले.
१९६२ : वेस्ट ईंडीझ संघाचे विघटन.
१९७० : पेरू मध्ये भूकंप. डोंगर कोसळून युंगे गाव नष्ट. ४७,००० ठार.
१९७४ : यॉम किप्पुर युद्ध इस्रायेल व सिरीयामध्ये तह.
१९९० : नेल्सन मंडेला यांना लेनिन आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्कार जाहीर.
१९९२ : प्रख्यात गुजराती कवी हरिंद्र दवे यांना १९९१ चा कबीर सन्मान मध्य प्रदेश सरकारकडून जाहीर.
२००५ : वॉटरगेट कुभांड : डब्ल्यु. मार्क फेल्टने आपणच डीप थ्रोट नावाने ओळखला जाणारा गुप्त बातमीदार असल्याचे कबूल केले.
२०१० : भारतात मान्यता मिळालेल्या प्रत्येक खासगी शाळेत गरीब मुलांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा करण्यात आला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६९ : मनुएल पहिला, पोर्तुगालचा राजा.
१५५७ : फियोदोर पहिला, रशियाचा झार.
१५७७ : मुघल शासक बादशाहा जहांगीर यांच्या पत्नी नूरजहाँ यांचा जन्मदिन.
१६४० : मिकाल विस्नियोवीकी, पोलंडचा राजा.
१६८३ : सेल्सियस थर्मामीटरचे शोध लावणारे जीन पियरे क्रिस्टिन यांचे जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १७५५)
१७२५ : महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १७९५)
१८४३ : भारतातील प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी नाटककार बळवंत पांडुरंग किर्लोस्कर उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्मदिन.
१८५२ : फ्रान्सिस्को मोरेनो, आर्जेन्टिनाचा शोधक.
१९१० : बालसाहित्यकार, विज्ञानकथाकार भास्कर रामचंद्र तथा भा. रा. भागवत यांचा जन्म. (मृत्यू: २७ ऑक्टोबर २००१)
१९२३ : रैनिये तिसरा, मोनॅकोचा राजा.
१९२८ : पंकज रॉय, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३० : क्लिंट ईस्टवूड, अमेरिकन अभिनेता, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक.
१९३१ : जॉन रॉबर्ट श्रीफर, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९३५ : जिम बॉल्जर, न्यू झीलँडचा पंतप्रधान.
१९३८ : जॉन प्रेस्कॉट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१९४३ : ज्यो नेमथ, अमेरिकन 'फूटबॉल'पटू.
१९६६ : रोशन महानामा, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४०८ : आशिकागा योशिमित्सु, जपानी शोगन.
१४१० : मार्टिन पहिला, अरागॉनचा राजा.
१७४० : फ्रीडरीक पहिला, प्रशियाचा राजा.
१७९९ : पिएर लेमॉनिये, फ्रेंच अंतरिक्षशास्त्रज्ञ.
१८७४ : प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड यांचे निधन. (जन्म: ७ सप्टेंबर १८२२ मांजरे, पेडणे, गोवा)
१९८८ : प्रसिद्ध भारतीय समाजसुधारक व हिंदी भाषिक लेखक संतराम बी. ए. यांचे निधन.
१९८८ : भारतीय राष्ट्रीय पक्षाचे राजकारणी व मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री व लेखक पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचे निधन.
१९१० : वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल यांचे निधन. (जन्म: ३ फेब्रुवारी १८२१)
१९६२ : एडॉल्फ आइकमन, नाझी अधिकारी.
१९७३ : कथालेखक दिवाकर कृष्ण केळकर तथा दिवाकर कृष्ण यांचे निधन. (जन्म: १९ ऑक्टोबर १९०२ गुंटकल, अनंतपूर, आंध्र प्रदेश)
१९९४ : बनारस घराण्याचे नामवंत तबलावादक पंडित सामताप्रसाद यांचे निधन. (जन्म: २० जुलै १९२१ वाराणसी)
२००२ : सुभाष गुप्ते, भारतीय क्रिकेट खेळाडू, लेग स्पिनर गोलंदाज, त्रिनिदाद येथे.
२००३ : प्रतिभासंपन्न संगीतकार अनिल बिस्वास यांचे निधन. (जन्म: ७ जुलै १९१४)
२००९ : केरळ साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय इंग्रजी भाषिक कवी तसचं, भारतातील केरळ राज्यातील मल्याळम भाषिक लेखिका कमला दास यांचे निधन.

cmyk
रविवार दि.३१ मे २०२६
५
राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# जालना पंचायत समितीत करोडोचा घोटाळा?

## घोटाळेबाज गटविकास अधिकारी संदीप पवारला निलंबित करण्याची मागणी

जालना । प्रतिनिधी

जालना पंचायत समिती अंतर्गत कार्यरत प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तथा गटविकास अधिकारी श्री. संदीप पवार यांच्या विरोधात विविध शासकीय योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, आर्थिक अपहार आणि बोगस निधी वाटप केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. जिल्हा परिषद जालना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत घरकुल योजना, सिंचन विहिरी, गाय गोठा योजना, मनरेगा, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत अभियान यामध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा दावा करण्यात आला आहे. गरीब लाभार्थ्यांकडून उघडपणे पैसे उकळून शासनाच्या निधीची लूट करण्यात आल्याने ग्रामीण भागात संतापाची लाट उसळली आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

तक्रारीनुसार प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना आणि मोदी आवास योजना यामध्ये लाभार्थ्यांकडून हप्ते मंजूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैशांची मागणी करण्यात आली. अनेक गावांमध्ये प्रत्यक्ष नवीन घरकुल बांधलेच नसताना जुन्या घरांना रंगरंगोटी करून त्यांना नवीन घरकुल दाखवण्यात आले आणि बोगस जिओ टॅगिंगच्या माध्यमातून शासनाचा निधी उचलण्यात आल्याचे आरोप आहेत. प्रत्येक लाभार्थ्याकडून आठ ते दहा हजार रुपयांपर्यंत सक्तीची वसुली करण्यात आल्याने गरीब कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. घरकुल योजनांच्या नावाखाली चाललेल्या या कथित भ्रष्टाचारामुळे शासनाच्या योजनांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सिंचन विहीर योजनांमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. नवीन विहीर मंजूर करून देण्यासाठी तसेच पुढील हप्ते बँक खात्यावर जमा करण्यासाठी प्रत्येकी वीस हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पैसे न देणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करून मानसिक त्रास दिल्याचेही आरोप आहेत. 'शरद पवार ग्रामसमृद्धी योजना' अंतर्गत गाय गोठा मंजुरीसाठी प्रत्येकी दहा हजार रुपयांची वसुली करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या नावावर चाललेली ही आर्थिक पिळवणूक थांबवून दोषींवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी जोर धरत आहे.

मनरेगा योजनांमध्ये बोगस मजूर हजेरी पट तयार करून शासनाचा निधी हडप करण्यात आल्याचा गंभीर आरोप देखील करण्यात आला आहे. प्रत्यक्ष मजुरांकडून काम न करून यंत्रांच्या साहाय्याने कामे करून लाखो रुपयांचा अपहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच १४ वा आणि १५ वा वित्त आयोगाच्या निधीतून वॉटर फिल्टर, एलईडी दिवे, कचरा कुंड्या यांसारख्या साहित्यांची चढ्या दराने खरेदी करून मोठ्या प्रमाणावर कमिशनबाजी झाल्याचा आरोप आहे. पंचायत समिती स्तरावर योजनांच्या नावाखाली सुरू असलेल्या या कथित भ्रष्टाचारामुळे शासनाच्या निधीचा अक्षरशः बाजार मांडल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. या सर्व व्यवहारांची आर्थिक चौकशी विभागामार्फत तपासणी करण्याची मागणी करण्यात येत आहे. 'जलजीवन मिशन' अंतर्गत ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांमध्ये अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे करून ठेकेदारांची बिले मंजूर करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अनेक गावांमध्ये नळजोडणी पूर्ण नसतानाही केवळ टक्केवारीसाठी कामे पूर्ण दाखवण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे. 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांच्या कामांमध्ये बोगस लाभार्थी दाखवून निधी उचलल्याचा आरोपही करण्यात आला आहे. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांमध्येच भ्रष्टाचाराचे जाळे उभे राहिल्यामुळे जनतेमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. गरीबांच्या नावावर निधी मंजूर करून तो काळ्या बाजारात वळवणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी आता तीव्र होत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, सर्व कामांचे प्रत्यक्ष फिल्ड व्हेरिफिकेशन करण्यात यावे आणि चौकशीदरम्यान कोणताही दबाव येऊ नये म्हणून श्री. संदीप पवार यांना तातडीने निलंबित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. बोगस कागदपत्रांच्या आधारे शासनाचा निधी लाटणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची मालमत्ता जप्त करण्याचीही मागणी पुढे आली आहे. जर पंधरा दिवसांच्या आत निष्पक्ष चौकशी सुरू झाली नाही तर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन आणि उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली असून भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी विकास पालवे गणेश मोरे संजय भालेराव स्वरूप सानप बाळू घुगे संतोष गाढवे फरहान अन्सारी अरुण सदावर्ते रमेश सदावर्ते मीरा खाडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# प्राजक्त तनपुरे यांचा भाजपत प्रवेश; शरद पवार गटाला जोरदार धक्का




अहिल्यानगर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आज अखेर भाजपमध्ये प्रवेश केला. गत अनेक दिवसांपासून प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू होती. त्यांनी वेळोवेळी आपल्या पक्षाविरोधातही भूमिका घेतली होती. अखेर त्यांनी आज भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपचे कमळ हाती घेतले. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे शरद पवार गटाला जोरदार झटका बसला आहे.

प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे भाचे आहेत. त्यांनी २०१९ च्या विधान सभा निवडणुकीत भाजपच्या शिवाजीराव कर्डिले यांना पराभूत करून विधानसभेत एन्ट्री केली होती. त्यानंतर महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये उच्च शिक्षण, ऊर्जा यासह एकूण ६ खात्यांचे राज्यमंत्रिपद मिळाले होते. पण त्यांच्या कुटुंबात आजोबा दोनदा आमदार होते, वडील एकदा खासदार व ५ वेळा आमदार राहिले, पण त्यानंतरही त्यांच्या कुटुंबांना मंत्रिपद मिळाले नव्हते. पण प्राजक्त तनपुरेंना पहिल्याच आमदारकीत राज्यमंत्रिपद मिळाले होते. त्यामुळे त्याची राज्यभर चर्चा झाली होती. पण गत काही महिन्यांपासून त्यांनी शरद पवार गटापासून अंतर राखले होते. हिंदुत्त्वावरील त्यांची भूमिका पाहता ते लवकरच भाजपमध्ये जातील अशी शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत त्यांनी आज भाजपमध्ये प्रवेश करून शरद पवार गटाला जोरदार धक्का दिला.

# शिफा पार्क येथे पाणी पुरवठ्याची पाईपलाइन टाकण्याचे काम सुरु

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरातील शिफा पार्क येथील नळाला कमी दाबाने पाणी येत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली होती. या ठिकाणी नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे यांनी भेट देऊन लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल असे आश्वासन दिले त्या अनुषंगाने या भागातील पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान शनिवार ता. ३० रोजी नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे व तोफिक कुरेशी, उबेद बागवान, पाणीपुरवठा विभागाचे श्री देवकर यांनी सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. यावेळी नगराध्यक्ष श्री बोराडे व सर्व मान्यवरांचा सत्कार संदीप उघडे, भगवान कुलकर्णी, रवी विरकर, मदन धोत्रे, किशोर वानुळे यांनी केला.यावेळी राजू चव्हाण.मनोहर विरकर.कारभारी धोत्रे.सुनिल चव्हाण.किशोर वानुळे.मदन धोत्रे.माने, जावळे, ठाकरे, रवी राठोड यांची उपस्थिती होती.


# तहसिलदार विजय चव्हाण यांच्या निर्णयाने रस्त्याचा वाद निकाली



अंबड । प्रतिनिधी

तालुक्यातील चांभारवाडी येथील अनेक वर्षांपासून बंद असलेला पारंपरिक रस्ता तहसिल प्रशासनाच्या पुढाकाराने मोकळा झाल्यानंतर ग्रामस्थांनी तहसिलदार विजय चव्हाण यांचे भावनिक शब्दांत आभार मानले यावेळी कुटुंबाच्या आनंदअश्रूने डोळे पनवले . या संदर्भातील एक भावनिक पोस्ट सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत असून, ग्रामस्थांनी तहसीलदार चव्हाण याच्या कार्यशैलीचे कौतुक केले आहे. चांभारवाडी येथील बहुरे व संबंधित कुटुंबीयांच्या वतीने व्यक्त करण्यात आलेल्या भावना सर्वसामान्यांच्या मनाला भिडणाऱ्या ठरत आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार आजोबा-पंजोबांच्या काळापासून वापरात असलेला हा रस्ता अनेक वर्षांपासून बंद होता. त्यामुळे शेतात जाण्या-येण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता.

शेतीची कामे, दैनंदिन हालचाली तसेच गावाशी असलेले भावनिक नाते या सर्वांवर त्याचा परिणाम होत होता. ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले आहे की, हा फक्त मातीचा रस्ता नव्हता तर आमच्या पूर्वजांच्या आठवणी, त्यांच्या पावलांचे ठसे आणि आमच्या बालपणीच्या स्मृती होत्या. अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या या प्रश्नाकडे तहसिलदार विजय चव्हाण यांनी केवळ प्रशासकीय फाईल म्हणून न पाहता, ग्रामस्थांच्या भावना समजून घेत सकारात्मक निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले. रस्ता मोकळा करण्यास परवानगी मिळाल्यानंतर गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. आयुष्याच्या उत्तरार्धात पुन्हा एकदा जुना मार्ग खुला होताना पाहण्याचे समाधान त्यांना लाभले, अशी भावना व्यक्त करण्यात आली. श्री. चव्हाण यांच्या निर्णयामुळे केवळ रस्ता खुला झाला नाही तर ग्रामस्थांच्या आशा, विश्वास आणि प्रशासनावरील श्रद्धाही अधिक दृढ झाल्याची प्रतिक्रिया या गावकऱ्यांनी दिली आहे. अधिकारी म्हणून नव्हे तर न्याय देणारे आणि सामान्य माणसांच्या भावना जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून तहसीलदार विजय चव्हाण कायम स्मरणात राहतील, असेही बहुरे कुटुंबीयांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. दरम्यान, या निर्णयामुळे चांभारवाडी परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून तहसील प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येत आहे.




जालना: विकास खारगे अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या जालना दौऱ्या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यातील जिल्हा महसूल विभागात श्री विकास खारगे यांनी जमीन संकलनाची तपासणी केली यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल , निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल तसेच यावेळी जिल्हा महसूल विभागातील विठ्ठल बोरकर, श्री कदम यावेळी हे होते.

# गोवंश कत्तल प्रकरणी नगरसेविकेच्या पती व मुलाविरुद्ध कारवाई

## धारदार शस्त्रांसह गोमांस जप्त;आरोपींना तीन दिवसाची पोलीस कोठडी

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरातील खंडोबा मंदिर जवळ पठाण मोहल्ला येथे गोवंश कत्तल करून मांस विक्रीसाठी साठवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी अंबड पोलिसांनी एका नगरसेविकेच्या पती व मुलगा अशा दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपीला आज न्यायालयामध्ये हजर केले असता न्यायालयाने १ जून पर्यंत पोलीस कोठडी दिली. या घटनेमुळे अंबड शहरात मोठी खळबळ उडाली आहे. यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, आज शुक्रवारी (ता. २९) दुपारी १ वाजेच्या सुमारास पठाण मोहल्यातील कंदम रसूल मशिदीजवळील एका जुन्या वाड्यात आरोपी अर्शद खुर्शीद अहमद शेख (वय ३२) व खुर्शीद अहमद गुलाम जिलानी शेख (वय ५५) (दोघेही रा. पठाण मोहल्ला, अंबड) हे गोवंश जातीच्या काळपट रंगाच्या गोन्ह्याची निर्दयीपणे कत्तल करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी गोमांसासह विविध प्रकारची धारदार शस्त्रे जप्त केली. यात मोठा चाकू, लोखंडी पाते असलेले सुरे, लाकडी मुठीचे चाकू, निळ्या व पांढऱ्या रंगाच्या मुठीच्या सुऱ्या, स्टीलचे चाकू तसेच लाकडी कुंदा यांचा समावेश आहे. याशिवाय सुमारे १५ किलो संरक्षित गोवंश मांसही जप्त करण्यात आले असून, त्याची किंमत अंदाजे ३ हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यावेळी पोलिसांनी गोमांस, धारदार शस्त्रे व इतर साहित्य, असा एकुण सुमारे २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस तपासात आरोपींनी संगनमत करून गोवंश जनावराची कत्तल केल्याचे समोर आले आहे. तसेच जनावरांच्या चाऱ्या-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यास बांधून ठेवण्यात आले होते. कत्तल केलेले मांस विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवल्याचे मिळून आले आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई अभिजित अडियाल यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात आरोपी अर्शद खुर्शीत अहमद शेख व खुर्शीद अहमद गुलाम जिलानी शेख यांच्या विरोधात कलम ५, ५ (ब), ५ (क), ९, ९ (अ), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० सह कलम ३ (५) भारतीय न्याय संहितानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अमोल गुरले हे करीत आहेत. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु,अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या आदेशावरून अंबड पोलिसांनी कारवाई केली.

# जायकवाडीमुळे पावणेदोन लाख हेक्टर पिके जोमात

## छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणीतील शेतकऱ्यांना फायदा



पैठण । प्रतिनिधी

उन्हाळ्यात जायकवाडी धरणाचा डाव आणि उजवा कालवा मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायिनी ठरले आहेत. सध्या या दोन्ही कालव्यांमधून ३८०० क्युसेकने सुरू असलेल्या पाणीपाळीमुळे संभाजीनगरसह पाच जिल्ह्यांतील पावणेदोन लाख हेक्टरवरील पिकांना आधार मिळाला आहे. सध्या जायकवाडी धरणामध्ये ३७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. या साठ्यातून दोन्ही कालव्यांमधून यंदाच्या हंगामातील तिसरी पाणीपाळी सोडण्यात आली आहे. यामध्ये डाव्या कालव्यातून सुमारे २ हजार २०० क्युसेक, तर उजव्या कालव्यातून १ हजार ६०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. या पाण्यावर छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि अहमदनगर या जिल्ह्यांतील सिंचन क्षेत्र अवलंबून आहे. या आवर्तनामुळे प्रामुख्याने बहुवार्षिक पिके असलेल्या ऊस, केळी, संत्रा यांसह उन्हाळी भुईमूग, तीळ, सोयाबीन आणि भाजीपाला पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

उन्हाची वाढती तीव्रता पाहता, आगामी काळात जोपर्यंत सार्वत्रिक आणि जोरदार पाऊस होत नाही, तोपर्यंत पिके जगवणे हे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान आहे. हीच गरज सध्या उन्हाळी पिकांसाठी दोन्ही कालव्यांतून पाणी सोडले जात आहे. जून महिन्यात पावसाची स्थिती पाहून पुढील निर्णय घेतला जाईल. या पाण्याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. परंतु, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाचा जास्तीत जास्त वापर करावा. काटकसरीने पाण्याचे नियोजन करण्यात यावे. - प्रशांत संत, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग जोपर्यंत मोठा पाऊस येत नाही, तोपर्यंत पाणी सुरू ठेवण्यात यावे जायकवाडीच्या कालव्यातून सुरू असलेले पाणी आवर्तन. सध्या भाजीपाला आणि इतर उन्हाळी पिके काढणीच्या व अत्यंत संवेदनशील अवस्थेत आहेत. जर अचानक कालव्याची पाणीपाळी बंद झाली, तर या पिकांचे उन्हामुळे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मान्सूनचा दमदार पाऊस सक्रिय होईपर्यंत सिंचनासाठीची ही पाणीपाळी अशीच सुरू ठेवावी, अशी आग्रही मागणी पैठण ता लुक्यातील शेतकरी नेते अप्पासाहेब निर्मळ, दीपक मोरे, किशोर दसपुते आणि शेखर देशमुख यांच्यासह लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी पाटबंधारे प्रशासनाकडे केली आहे.

# खंडाळा येथे पारंपरिक आखाडी पंचमी उत्सवाची उत्साहात सांगता

खंडाळा। प्रतिनिधी

सोशल मीडिया, इंटरनेट आणि टीव्हीमुळे माणसाच्या मनोरंजनाच्या संकल्पना पूर्णपणे बदलून गेल्या आहेत. या आधुनिकतेच्या लाटेचा मोठा फटका ग्रामीण भागातील जुन्या प्रथा आणि परंपरांना बसत असून, अनेक उत्सवांचे स्वरूपही बदलले आहे. सोंगांचे मुखवटे बनवणारी पिढी आणि हे कलाकार आता अखेरचा श्वास घेत आहेत. मात्र, हीच धोक्यात आलेली समृद्ध परंपरा टिकवून ठेवण्यासाठी वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथील नागरिकांनी पुढाकार घेतला आहे. खंडाळ्यातील धार्मिक उत्सवांमध्ये प्रमुख मानल्या जाणाऱ्या पारंपरिक आखाडी (देवी) उत्सवाची शुक्रवारी उत्साहात सांगता झाली.

प्रत्येक व्यक्तीवर त्याच्या सामाजिक परिस्थितीचा प्रभाव असतो आणि त्यानुसार त्याचे रूपांतर होत असते. प्रत्येकाच्या आयुष्यात एक अदृश्य मुखवटा असतो, जो स्वार्थ, व्यथा, वेदना आणि सुख इतरांपासून लपवून ठेवतो. यामुळेच चेहरा आणि मुखवटा हे समीकरण नेहमीच मानवी मनाला स्तिमित करत आले आहे. हे मुखवटे कधी, कसे आणि कोणी आणले? असे प्रश्न पडत असले, तरी प्रत्येक धर्मात आणि समाजात परंपरेच्या अर्थाने मुखवट्यांना एक वेगळे स्थान आहे. याच परंपरेचा एक भाग म्हणून खंडाळा येथे अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या देवांचे मुखवटे परिधान करून आखाडी पंचमी साजरी केली जाते. यंदा २४ मे पासून या उत्सवाला सुरुवात झाली होती.

पाच दिवस चाललेल्या या उत्सवाची सांगता २९ मे रोजी पहाटे भवानी मातेचे सोंग काढून झाली. भवानी मातेच्या सोंगाची गावातून भव्य मिरवणूक यंदा भवानी मातेचे सोंग घेण्याचे मानकरी अमोल गोरखनाथ बहाळस्कर होते. पहाटे भवानी मातेच्या सोंगाची संपूर्ण गावातून वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील नागरिकांनी दारोदारी भवानी मातेच्या स्वरूपातील या सोंगाची मनोभावे पूजा केली. आधुनिकतेच्या काळातही खंडाळावासीयांनी जपलेली ही मुखवट्यांची परंपरा आणि संस्कृती पंचक्रोशीत कौतुकाचा विषय ठरत आहे.

# शिवसेनेचा झेंडा अधिक बळकट करा , मी तुमच्या पाठीशी खंबीर – खा.श्रीकांत शिंदे

## केज, परळी विधानसभेतील शिवसंवाद दौऱ्याला हजारो शिवसैनिकांची उपस्थिती; खा.शिंदे यांनी केज व परळी विधानसभेतील पदाधिकाऱ्यांचे केले कौतुक

बीड । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेचा झेंडा अधिक बळकट करा मी तुमच्या पाठीशी खंबीर आहे असे आवाहन शिवसेना नेते खासदार श्रीकांत शिंदे यांनी केले. तसेच दोन्ही मतदारसंघातील बूथ प्रमुखांच्या नेमणुका १००% पूर्ण केल्याबद्दल केज विधानसभा व परळी विधानसभा तील पदाधिकाऱ्यांच्या कामाचं कौतुकही डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी आवर्जून केले

खासदार श्रीकांत शिंदे शुक्रवारी बीड जिल्हा दौऱ्यावर होते. या निमित्त केज व परळी विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक शुक्रवारी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडली. या बैठकीत खासदार श्रीकांत शिंदे यांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद पंचायत समिती वाईज पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेचा धनुष्यबाण प्रत्येक घरात पोहोचवण्याची जबाबदारी शिवसैनिकांवर दिली

खासदार शिंदे म्हणाले की, शिवसेना पक्ष संघटन हेच आपले खरे बळ असून आगामी निवडणुकांमध्ये प्रत्येक बूथवर पक्षाची ताकद दिसली पाहिजे. कार्यकर्त्यांनी जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून शिवसेनेच्या विचारांना घराघरात



पोहोचवावे. केज व परळी मतदारसंघात शिवसेनेची ताकद वाढत असून आगामी निवडणुकांत त्याचे सकारात्मक परिणाम दिसतील असे ते म्हणाले. बैठकीत त्यांनी मतदारसंघातील बूथ रचना, संघटनात्मक बांधणी तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेत पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. स्थानिक पातळीवर अधिक सक्रिय राहून संघटन मजबूत करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी कार्यकर्त्यांनी गावपातळीवर पक्ष विस्तारासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. बैठकीस मंत्री भरत शेठ गोगावले, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, खासदार संदिपान जी भुमरे, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठा सचिव अशोक पटवर्धन, माजी खासदार आनंद परांजपे उपनेते संगीता ताई ठोंबरे, माजी आमदार सुनील धांडे युवा सेनेचे अभिमन्यू खोतकर बाजीराव चव्हाण महिला संपर्कप्रमुख संगीताताई चव्हाण, महिला जिल्हाप्रमुख डॉ. प्रतिभाताई थोरात, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे ऋषिकेश लोमटे, उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ लोमटे, राजा पांडे, तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे ,तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील ,विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख वैजनाथ माने, गणेश जाधव, युवा सेना तालुकाप्रमुख दत्तप्रसाद काकडे ,बाबा सोनवणे, समीरण मसलकर, युवा सेना शहर प्रमुख आकाश चाळक, महिला तालुकाप्रमुख जयाताई राऊत ,सुनीताताई जाधव, यशोदाताई राठोड ,महिला शहर प्रमुख वैशालीताई सांगळे सह अंगीकृत संघटनांचे जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, विधानसभा प्रमुख, शहरप्रमुख, उप तालुकाप्रमुख, विभाग प्रमुख, सर्कल प्रमुख, शाखाप्रमुख बुथप्रमुखा सह हजारो शिवसैनिक उपस्थित होते.

# २५ तोळे सोने व गॅस सिलेंडरच्या मागणीसाठी पत्नीचा छळ; पतीस १८ महिन्यांची सक्तमजुरी

**आष्टी । प्रतिनिधी**

पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करून २५ तोळे सोने व गॅस सिलेंडरची मागणी केल्याप्रकरणी आष्टी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने (जेएमएफसी) आरोपी पतीस दोषी ठरवत १८ महिन्यांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच ७ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला असून त्यापैकी ६ हजार रुपये फिर्यादी महिलेस नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

दि. २९ मे २०२६ रोजी आष्टी येथील जेएमएफसी न्यायालय क्रमांक ३ चे न्यायाधीश श्री. महेश आर. बडाख यांनी हा निकाल दिला. आरोपी शंभूराज मोहनराव खलाटे (रा. खुंटे, ता. फलटण, जि. सातारा) याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत गुन्हा सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद केले.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी महिलेचा विवाह ११ जून २०१५ रोजी आरोपी शंभूराज खलाटे याच्यासोबत झाला होता. विवाहानंतर काही काळ संसार सुरळीत सुरू असताना आरोपीने पत्नीवर २५ तोळे सोने व गॅस सिलेंडर आणण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. मागणी पूर्ण न झाल्याने पत्नीला वारंवार मानसिक त्रास देण्यात आला. तसेच तिचा शारीरिक छळ करून मारहाण करण्यात आली व काही वेळा उपाशी ठेवण्यात आल्याचेही न्यायालयासमोर आले. फिर्यादीने न्यायालयात दिलेल्या साक्षीनुसार, माहेरहून सोन्याची व्यवस्था करून आणण्यासाठी तिच्यावर सातत्याने दबाव टाकण्यात येत होता. मागणी पूर्ण न झाल्याने डिसेंबर २०१५ मध्ये तिला घराबाहेर काढण्यात आले. एवढ्यावरच न थांबता आरोपीने माहेरी जाऊनही तिचा छळ केल्याचे पुराव्यांमधून स्पष्ट झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. या प्रकरणात सरकार पक्षाने फिर्यादी महिलेसह एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवली. सादर करण्यात आलेले पुरावे, साक्षीदारांचे जबाब आणि तपासातील ◀◀ पान ३ वर

# अन् तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का?

## खा.श्रीकांत शिंदे यांचे धनंजय पापा सोळंके यांना सूचक संकेत



माजलगाव । प्रतिनिधी

शिवसेनेच्या राज्यव्यापी 'शिवसंवाद दौऱ्या'अंतर्गत बीड व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, युवासेना,महिला आघाडी व शिवसैनिकांची आढावा बैठक दि २९ मे शुक्रवार रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.या बैठकीला शिवसेना नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

बैठकीत माजलगाव शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी माजलगाव मतदारसंघातील संघटनात्मक प्रश्न, विकासनिधीचे असमान वाटप आणि शिवसैनिकांवरील अन्याय याबाबत परखड भूमिका मांडली.त्यांनी मागील चार वर्षांपासून माजलगाव मतदारसंघाला डीपीडीसी अंतर्गत कोणताही निधी मिळाला नसल्याचा मुद्दा उपस्थित करत जिल्हा नेतृत्वाने मतदारसंघावर अन्याय केल्याची खंत व्यक्त केली.यावेळी सोळंके यांनी बीड शहरातील एकाच भागातून अनेक जिल्हाप्रमुखांची नियुक्ती करण्याऐवजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मागणी केली.त्यांच्या या स्पष्ट व रोखठोक भूमिकेची दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का? असे सूचक वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले असून ◀◀ पान ३ वर

# हनुमान मूर्तीची विटंबना ब्रम्हगांवमध्ये तणाव!

गेवराई । प्रतिनिधी


तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ब्रह्म गाव येथे मारुतीच्या मंदिरात असलेल्या मूर्तीला अज्ञात लोकांनी मटन चिकटवून विटंबना केल्याचा घृणास्पद प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असला तरी अद्याप कोणालाही अटक केली नसल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ब्रह्मगाव येथे मारुतीचे मंदिर आहे या मंदिरात असलेल्या मूर्तीला अज्ञात लोकांनी मटन चिकटवून विटंबना केल्याचा प्रकार उघडकीस आला. हा सर्व प्रकार गुरुवारी पहाटे लक्षात आल्यानंतर गावातील लोकांनी पोलिसांना याची माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन या गंभीर प्रकरणाची दखल घेत अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे मात्र ग्रामस्थांनी ज्या दोन लोकांवर संशय व्यक्त केला आहे त्यांच्याविरुद्ध अद्याप पर्यंत कुठलीच कारवाई झाली नसल्यामुळे गावात तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान ही घटना उघडकीस आल्यानंतर शनिवारी सकाळी नऊ वाजता या मंदिरात ग्रामस्थांच्या वतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली जात आहे.

# खा. सोनवणे यांच्या कार्यालयात जाऊन सोमवारी शेतकरी गाऱ्हाणे मांडणार

## पीक विमा मंजुरीसाठी शेतकऱ्यांनी एकजूट होऊन आवाज उठवावा : भाई थावरे



माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक विम्या संदर्भात शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी दि.१ जून सोमवार रोजी खासदार बजरंग सोनवणे यांच्या केज येथील कार्यालयात भेट देऊन गाऱ्हाणे मांडणार आहे. या प्रश्नी शेतकऱ्यांनी एकजूट होऊन आवाज उठवावा असे आवाहन भाई थावरे यांनी केले आहे.

थावरे म्हणाले की, जिल्ह्यातील ९० हजार ४१८ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरवण्यात आला असून,शेतकऱ्यांनी एकूण ५ कोटी २४ लाख ३९ हजार ८२० रुपये इतका प्रीमियम भरला आहे.मात्र, ◀◀ पान ३ वर

# रस्त्यासाठी बेलेश्वरवस्तीवरील महिलांनी लेकराबाळांसह गाठले तहसील कार्यालय



## रस्ते अडवणाऱ्यांवर कारवाईच्या घोषणा केवळ कागदावरच –डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी ग्रामपंचायत अंतर्गत २०० लोकसंख्या असलेल्या बेलेश्वरवस्तीवरील महिलांनी लेकराबाळांसह थेट बीड तहसील कार्यालय गाठून शेतरस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली. मुलांच्या शाळा, दवाखाना, बाजारहाट तसेच शेतीच्या कामांसाठी वापरला जाणारा रस्ता काही व्यक्तींनी अडवल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) व शेख युनूस उपस्थित होते. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी सकारात्मक ◀◀ पान ३ वर

# वडझरी आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाचे निलंबन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था संचलित प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रविण लिंबाजी वनवे यांना शासकीय आदेशांचे उल्लंघन, आर्थिक वसुलीबाबत माहिती न देणे तसेच कर्तव्यात सातत्याने हयगय केल्याच्या कारणावरून अखेर निलंबित करण्यात आले आहे. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण, छत्रपती संभाजीनगर यांनी ही कारवाई केली आहे.




निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय परळी तालुक्यातील दारावती येथील प्राथमिक आश्रमशाळेत निश्चित करण्यात आले असले, तरी वडझरी येथील मूळ आश्रमशाळेवर अद्याप कोणत्याही सक्षम व्यक्तीकडे मुख्याध्यापक पदाचा प्रभारी कार्यभार सोपवण्यात आलेला नाही. त्यामुळे शाळेच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजासह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्राथमिक आश्रमशाळा वडझरी येथील शिक्षिका श्रीमती विनिता भिमराव बांगर यांच्या २०१२ ते २०१६ या कालावधीतील हजेरीपत्रक, बँक स्टेटमेंट व वेतनाशी संबंधित कागदपत्रांची तपासणी सुरू होती. याचबरोबर शालेय पोषण आहार प्रकरणात शिक्षण अधिकारी, बीड यांनी मुख्याध्यापक प्रविण वनवे यांच्याकडून १ लाख २२ हजार ९९० रुपयांची वसुली करण्याचे आदेश दिले होते. या संदर्भातील कागदपत्रे व अहवाल सादर करण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बीड येथील सहाय्यक संचालकांनी मुख्याध्यापक वनवे यांना वारंवार लेखी आदेश देऊन प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास सांगितले होते. मात्र, वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशांकडे दुर्लक्ष करत त्यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती सादर केली नाही. तसेच प्रशासकीय कामकाजात असहकार्याची भूमिका घेतल्याचा ठपकाही त्यांच्यावर ठेवण्यात आला.

# शिवसंवाद दौऱ्यातून संघटन बळकटीचा निर्धार; गेवराई-आष्टीत पदाधिकाऱ्यांना श्रीकांत शिंदेंच्या महत्त्वपूर्ण सूचना

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यात सुरू असलेल्या शिवसेनेच्या 'शिवसंवाद दौऱ्या'च्या दुसऱ्या टप्प्यात गेवराई व आष्टी विधानसभा मतदारसंघांतील पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी तसेच शिवसैनिकांच्या आढावा बैठका उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बळकटी, बूथनिहाय नियोजन, गावपातळीवरील पक्षविस्तार आणि जनसंपर्क मोहिमेच्या कामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत मार्गदर्शन करताना खासदार श्रीकांत शिंदे यांनी



पदाधिकाऱ्यांना जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. सत्तेचा उपयोग सर्वसामान्य नागरिक आणि शिवसैनिकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी व्हावा, असे सांगत त्यांनी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या मतदारसंघातील अडीअडचणींचा नियमित आढावा घेऊन पक्ष नेतृत्वाच्या संपर्कात राहावे, असे निर्देश दिले.

राजकारण हे केवळ सत्ता मिळवण्यासाठी नसून जनतेची सेवा करण्याचे माध्यम आहे. लोकांची कामे झाली तर शिवसेनेबद्दलचा विश्वास अधिक दृढ होईल आणि आगामी निवडणुकांमध्ये जनतेचा पाठिंबा अधिक वाढेल, असे श्रीकांत शिंदे म्हणाले. यावेळी त्यांनी निष्क्रिय पदाधिकाऱ्यांनाही स्पष्ट शब्दांत इशारा दिला. केवळ पद घेऊन मिरवणूक करणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे. शिवसेना वाढीसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येक पदाधिकाऱ्याच्या पाठीशी मी ठामपणे उभा राहीन, असे ते म्हणाले. तसेच जिल्हाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांनी संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. गेवराई मतदारसंघात सध्या केवळ सात पदाधिकाऱ्यांची अधिकृत नियुक्ती झालेली आहे. काही पदाधिकारी केवळ नावापुरते पद धारण करून आहेत; मात्र पक्षाच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग दिसून येत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. बैठकीस मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन, युवासेनेचे अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम, बीड जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपनेत्या संगीता ठोंबरे, शिवसेना नेत्या संगीता ताई चव्हाण, माजी आमदार ◀◀ पान ३ वर

# काडीवडगाव येथे जयसिंग केसरी बैलगाडी शर्यतीत थरार रंगला

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वडवणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित केलेल्या जयसिंग केसरी २०२६ बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये प्रथम क्रमांक सर्जा आणि सुंदर, द्वितीय क्रमांक माणिक शेठ व रुद्रा यांच्या जोडीने, तिसरा क्रमांक मेजर आणि सर्जा यांनी पटकावला.शर्यत पाहण्यासाठी बैलगाडा प्रेमींनी भरभरून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याने धरण परिसरात यात्रेची स्वरूप प्राप्त झाले होते.यामध्ये २३४ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

. तालुक्यात छत्रपती संभाजी महाराज जयंती निमीत्त जयसिंग केसरी २०२६ बैलगाडा शर्यत तिचे आयोजन गुरुवार दि २८ रोजी काडीवडगाव येथील सुसज्ज आशा भव्य मैदानात करण्यात आले होते.या कार्यक्रमात प्रथम बैलगाडी पूजन व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन माजलगाव मतदार संघाचे युवा नेते जयसिंग भैया सोळंके व उपस्थित मान्यवरांच्या शुभ हस्ते करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे सुंदर असे नियोजन करण्यात आले होते यामध्ये वैद्यकीय व पशुवैद्यकीय सेवा,नाष्टा पाण्याची सोय,प्रेक्षकांना वेळोवेळी सूचना देण्यासाठी साऊंड सिस्टिम,लाईव्ह प्रक्षेपण, ऊना पासुन संरक्षण मिळण्यासाठी मंडप आसण व्यावस्था,पार्कींग सुविधा,तगडा स्वयंसेवक व पोलीस बंदोबस्तामध्ये





## २३४ बैलगाडी शर्यतीत स्पर्धकांचा सहभाग

ठेवण्यात आला होता.या स्पर्धेमध्ये प्रथम येण्याचा बहुमान नांदेवली येथील सर्जा आणि संभाजीनगर येथील सुंदर या जोडीने प्रथम क्रमांक पटकावत रोख रकम ५१ हाजार रु व मानाच्या दोन ढाल.तर द्वितीय क्रमांक माणिक सेट आणि रुद्रा यांच्या जोडीने पटकावला त्यांना रोख ४१ हजार रु पारीतोषीक मानाच्या दोन ढाल,तिसऱ्या क्रमांक वेदिका गाडे यांचा सर्जा आणि बाळू शिंदे यांचा मेजर या जोडीने पटकावल्याने त्यांना रोख ३१ हाजार मानाच्या दोन ढाल,चौथा क्रं.शंभू आणि शंभूराजा या जोडीने रोख २१ ह रु मानाच्या दोन ढाल,पाचव्या क्रंमांक मार्शल आणि

# अवकाळी पावसाने सौर ऊर्जा यंत्रणा भुईसपाट

चौसाळा । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या माळेवाडी तालुका बीड येथील शेतकरी अर्चना उत्तरेश्वर खोमणे यांच्या शेतामधील उभारलेल्या सोलार ऊर्जा यंत्रणेचा पंप अवकाळी पावसाने वाऱ्याने भुईसपाट झाला आहे सदर संबंधी शेतकऱ्याला तातडी नुकसान मिळावे अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे सदर प्रकरणी माहिती अशी की माळेवाडी येथील शेतकरी अर्चना उत्तरेश्वर खोमणे यांच्या शेतातील विहिरीवरील सौर ऊर्जा यंत्रणा ३ एचपी बसविण्यात आला आहे२३/०५/२०२६ रोजी सायंकाळच्या दरम्यान सुटलेल्या सुसाट वाऱ्याने सौर ऊर्जा पॅनल मधील पाच प्लेटा राफ्टर तीन ब्लेड त्याच्यासह फाउंडेशन खराब होऊन नुकसान झाले आहे तरी संबंधित नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने मदत द्यावी अशी मागणी माळवाडी येथील कार्यकर्ते सीताराम भरणे या शेतकऱ्याने केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26